


सातारा जिल्ह्यातील एकमेव नि:पक्ष व निर्भिड दैनिक

स्थापना १९३५

# ग्रामोध्दार

हॉटेल पर्ल
परमिट रूम व बार
५२ भवानी पेठ,
मोती चौक, सातारा.
फोन : ०२१६२-२८४९६८

सातारा || वर्ष : ९० वे || अंक : ११८ || सोमवार, दि. ०५ ऑगस्ट २०२४ || किंमत २ रुपये || RNI No. 11460/1957 www.gramoddharnews.com www.facebook.com/gramodhar पाने – ८

# २० तारखेला महाविकास आघाडीची महत्वाची बैठक

## जागावाटप अन् मुख्यमंत्रिपदाबाबत निर्णय होणार



**मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात राजकारण तापले आहे. एकीकडे महायुतीची जागावाटपाबाबत चर्चा सुरू आहे, तर दुसरीकडे महाविकास आघाडीत लवकरच बैठक होण्याची शक्यता आहे. माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त २० ऑगस्ट रोजी महाविकास आघाडीची बैठक होणार असल्याचा दावा महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी केला आहे.**

एएनआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी सांगितले की, २० ऑगस्ट रोजी राजीव गांधी यांची जयंती आहे. त्याच दिवशी राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे मुंबईत येतील आणि त्यांची महाविकास आघाडीतील नेत्यांसोबत बैठक होईल. या बैठकीत आगामी विधानसभा निवडणूक आणि मुख्यमंत्रिपदाबाबत चर्चा होईल.चेन्निथला पुढे म्हणाले, शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) प्रमुख शरद पवार ह ेदेखील या बैठकीला उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासोबत काँग्रेस नेते जागावाटपाबाबत चर्चा करतील. ज्याप्रमाणे महाविकास आघाडीने लोकसभा निवडणूक एकत्र लढवली होती, त्याचप्रमाणे राष्ट्रवादी (शपा), काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) विधानसभा निवडणूक एकत्र लढणार आहेत.महाराष्ट्रातील विधानसभेच्या २८८ जागांसाठी यावर्षी ऑक्टोबरमध्ये निवडणूक होणार आहे. सर्वच पक्षांनी आपला जनाधार मजबूत करण्यासाठी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणुकीत चांगली कामगिरी केल्याने काँग्रेसचा उत्साह वाढला आहे. महाविकास आघाडीतील नेतेही विधानसभा **(पान ६ पहा)**

# अजित पवार गटाचे आमदार पिता-पुत्र शरद पवारांच्या भेटीला

## राजकीय घडामोडींना वेग



**पुणे : विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. अजित पवार गटाचे माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनदादा शिंदे आणि त्यांचे पुत्र रणजितसिंह शिंदे हे शरद पवार यांच्या भेटीसाठी आले आहेत. पुण्यातील मोदी बाग इथं बबनदादा शिंदे आणि रणजितसिंह शिंदे पोहोचले आहे. त्यामुळं राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. अजित पवार गटाचे आणखी एक आमदार शरद पवार गटात घरवापसी करणार का? असा सवाल उपस्थित केला जातो.**

शरद पवार हे सध्या पुण्यातील मोदी बागेमध्ये आहेत. या ठिकाणी अनेकजण शरद पवार यांची भेट घेण्यासाठी आले आहेत. अशातच माढा तालुक्याचे आमदार बबनदादा शिंदे आणि त्यांचे (पान ६ पहा)



# सेल्फी काढताना दरीत कोसळलेल्या पुण्यातील युवतीला वाचविण्यात यश

**सातारा : सज्जनगड ठोसेघर मार्गावर बोरणे घाटात सेल्फी काढताना खोल दरीत पडलेल्या युवतीला वाचविण्यात स्थानिक ग्रामस्थ, पोलिस आणि छत्रपती शिवेद्रसिंहराजे रेस्कु टीममला यश आले. या अपघातात युवती गंभीर जखमी झाली असून तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. ही घटना शनिवारी सायंकाळी घडली. या दुर्घेटनेत नसरीन गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने साताऱ्यातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. अतिदक्षता विभागामध्ये तिच्यावर उपचार सुरू आहेत.**

सेल्फी काढण्याच्या नादात एक तरुणी १०० फूट खोल दरीत पडली, पण पोलीस आणि स्थानिक ट्रेकर्संच्या मदतीने अथक प्रयत्नांची पराकाष्टा केल्यामुळे सुदैवाने बचावली. आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत धबधब्यावर फिरायला नसरीन कुरेशी असं या २९ वर्षीय तरुणीचं नाव असून ती पुण्यातील रहिवासी आहे. ०३ ऑगस्ट रोजी पावसातील पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी नसरीन आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत ठोसेघर धबधब्यावर फिरायला गेली होती. मात्र, सुरक्षेच्या दृष्टीने साताऱ्यातील ठोसेघर धबधबा बंद असल्यानं नसरीन आणि तिच्या ग्रुपने मागे परतण्याचा निर्णय घेतला.

धबधबा बंद असल्याने निसर्ग पर्यटनाची निराशा झाली होती, पण परतीच्या प्रवासादरम्यान तोच आनंद घेण्यासाठी या मित्रांच्या ग्रुपने बोरणे घाटात गाडी थांबवली. सर्वजण पावसाचा आनंद घेत फोटो काढू लागले. हिरवागार निसर्ग पाहून नसरीनलाही सेल्फी घेण्याचा मोह आवरला आहे. नसरीन सेल्फी फोटो काढत होती. मात्र , तेवढ्यात पावसाच्या संततधारेमुळे ओलीव झालेल्या येथील घाटाच्या कठाडावरुन नसरीनचा पाय घसरला. नसरीन १०० फूट दरीत कोसळली. सुदैवाने, काळ आलेला पण वेळ आली नव्हती असंच नसरीनसाठी घडलं. खोल दरीत कोसळून नसरीन थोडक्यात बचावली. एका झाडाचा आधार घेऊन ती कशी बशी जीव मुठीत धरुन होती. नसरीनच्या मित्रांनी स्थानिक पोलिसांना घटनेबाबत कळवलं. पोलिसांनी तात्काळ बचावकार्यासाठी होमगार्ड आणि संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या टीमला माहिती दिली. या घटनेची माहिती कळताच ठोसेघर संयुक्त वन व्यवस्थापन समितीचे कर्मचारी प्रवीण चव्हाण, प्रथमेश जानकर, समाधान काकडे, प्रतीक काकडे, रामचंद्र चव्हाण, तसेच सातारा तालुका पोलीस **(पान ६ पहा)**

# मुंबईत सोसायटीच्या मिटींगमध्ये वाद

## अध्यक्षाने सदस्याचा अंगठा दाताने तोडला



**मुंबई : राजधानी मुंबईतील एका गृहनिर्माण सोसायटीतील धक्कादायक घटना समोर आली आहे. आज रविवार असल्याने सोसायटीच्यावतीने सदस्यांसाठी बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. मात्र, या बैठकीत सदस्य आणि अध्यक्षात चांगलीच जुंपली, त्याचे पडसाद चक्क हाणामारीत झाल्याचं पाहायला मिळालं. या हाणामारीत सोसायटीच्या अध्यक्षाने चक्क सोसायटी सदस्याचा अंगठाच कापल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मुंबईच्या दहिसर येथील पश्चिम म्हात्रेवाडीत हा प्रकार घडला. याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.**

मुंबईच्या दहिसर येथील पश्चिम म्हात्रेवाडी येथील अमरनाथ अपार्टमेंटमध्ये आज सकाळी सोसायटी अध्यक्षांकडून बैठकीचं आयोजन करण्यात आलं होत. या बैठकीला अध्यक्षांसह सदस्यांची उपस्थिती होती. यावेळी, सोयायटी सदस्य आदित्य देसाई यांचा सोसायटी अध्यक्ष नित्यानंद परिहार यांच्यासोबत वाद झाला. या झटापटीत अध्यक्ष नित्यानंद परिहार यांनी चक्क दाताने सदस्य असलेल्या आदित्य यांचा अंगठाच तोडल्याचा आरोप आदित्या यांनी केला आहे. या घटनेनं सोसायटीत चांगलीच खळबळ उडाली असून याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे.

दरम्यान, आदित्य देसाई यांच्यावर रुग्णालयात उपचार करण्यात आले असून त्यांच्या हाताला ड्रेसिंग केली आहे. याप्रकरण एमएचबी पोलिसांकडून याबाबत अधिक तपास करण्यात येत आहे.

# बांगलादेशात पुन्हा हिंसक आंदोलन

## ३२ जणांचा मृत्यू; देशात कर्फ्यूची घोषणा

**ढाक्का : बांगला देशात पुन्हा एकदा हिंसक आंदोलन पेटलं आहे. ढाका इथं पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी करणारे आंदोलक आणि सत्ताधारी अवामी पक्षाचे समर्थक यांच्यात रविवारी झटापट झाली. या झटापटीत ३२ लोकांचा मृत्यू झाला असून शेकडो जण जखमी झाले आहेत. पंतप्रधानांच्या राजीनाम्याची मागणी करत असहकार कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आंदोलक आले होते. अवामी लीग, छात्र लीग आणि जुबो लीगच्या कार्यकर्त्यांनी त्यांना विरोध केला आणि त्यानंतर दोन्ही गटांमध्ये जोरदार हाणामारी झाली.**



या जमावाला नियंत्रित करण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडल्या आणि स्टेन ग्रेनेडचाही वापर केला. या सर्व प्रकारामुळेब ांगलादेशातपुन्हा एकदा अनिश्चित काळासाठी कर्फ्यूची घोषणा करण्यात आली आहे. पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी आणि आरक्षणाबाबत सुधारणेबाबत झालेल्या आंदोलनात मृत व्यक्तींच्या वारसांना न्याय देण्याची मागणी आंदोलनकर्ते करत होते.

असहकार आंदोलनाच्या पहिल्या दिवशी राजधानीतील सायन्स लॅब चौकात लोकांनी एकत्र येत सरकारविरोधी घोषणा दिल्या. ढाका येथील सायन्स लॅब, धानमंडी, मोहम्मदपूर, **(पान ६ पहा)**



# संक्षिप्त वार्ता

## शामगावच्या शेतीच्या पाण्याचा प्रश्न विधानसभा निवडणुकीपूर्वी सुटणार : रामकृष्ण वेताळ



**संसार उपोयोगी साहित्य वाटपवेळी रामकृष्ण वेताळ, शंकरराव शेजवळ, दिपालीताई खोत, मुरली पोळ व इतर.**

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कराड :** गेल्या अनेक वर्षांपासून शामगाव शेतीच्या पाण्यापासून वंचीत आहे. जलसंपदा मंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून शामगावच्या पाण्याचा प्रश्न विधानसभा निवडणूकी पुर्वी सुटणार असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे किसान मोर्चा प्रदेश सरचिटणीस रामकृष्ण वेताळ यांनी केले. शामगाव येथे संसार उपोयोगी साहित्य वाटप आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी कराड उत्तर भाजपा अध्यक्ष शंकरराव शेजवळ, भाजपाच्या जिल्हा महिला सचिव दिपालीताई खोत, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष सिमा घार्गे, भाजपाचे कराड तालुका सरचिटणीस बाळासाहेब पोळ, शामगाव शाखा अध्यक्ष मुरलीधर पोळ,उद्योजक सुरेश पोळ, ग्रामपंचायत सदस्य राहुल तुकाराम नलवडे, दत्ता साळुंखे, जयसिंग डांगे,कृष्णत पोळ,योगेश फाटक,धनाजी पोळ , हणमंतराव पोळ ,संतोष कणसे, आदीसह ग्रामस्थ लाभार्थी उपस्थिती होते.

यावेळी बोलताना वेताळ म्हणाले, ७० वर्षांमध्ये कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस यांनी कोणतेही लाभ थेट जनतेपर्यंत दिले नाहीत.ते लाभ देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून दिले जात आहेत. अनेक लाभाच्या योजना राबविण्यात येत आहेत. लाभार्थ्यांनी आपल्याला कोण मदत करतो याची जाणीव ठेवून येणाऱ्या काळात मतदान केले पाहिजे शामगावच्या शेतीच्या पाण्याचा प्रश्न उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून मार्गी लागणार आहे.राज्य शासनाच्या माध्यमातून तळागाळातील लोकांपर्यंत वेगवेगळ्या योजनेची माहिती लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी भाजपा कार्यकर्तानी प्रयत्न केले पाहिजेत हे शासन काम करणारे आहे.

यावेळी दिपाली खोत यांनीही मार्गदर्शन केले. बाळासाहेब पोळ यांनी यांनी केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांची माहिती दिली.यावेळी शंकरराव शेजवळ, सुरेश पोळ यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार राहुल यादव यांनी मानले.

## साताऱ्यात दि.७ रोजी गुमनाम हैं कोई बरसणार!

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** गंधार प्रस्तुत हिंदी मराठी चित्रपटातील हृदयाचा ठाव घेणाऱ्या हॉउटिंग मेलोडाइजची सुरेल गीतांजली,गुमनाम हैं कोई हा कार्यक्रम बुधवार दि.७ रोजी सायंकाळी ५।। वा.येथील दिपलक्ष्मी सांस्कृतिक हॉलमध्ये बरसणार आहे.

प्रा.धनंजय जाधव यांची संकल्पना असुन धनश्री बागडे गायिका म्हणुन गाण्यांची मैफिल सादर करतील.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन डॉ.कामिनी पाटील,संध्या चौगुले,अनिल वाळिंबे,हेमंत कासार,अनिल वीर,रेणू एळगावकर व शिरीष चिटणीस यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.तेव्हा सुरेल मैफिलीचा लाभ घेण्यासाठी रसिकांनी उपस्थीत रहावे. असे आवाहन दिपलक्ष्मी पतसंस्थेचे व्यवस्थापक विनायक भोसले यांनी केले आहे.

## शाहु बोर्डिंगमध्ये खाऊ वाटप करून रिपब्लिकन सेनचे अनोख्ये अभिवादन



**मुलांना खाऊ वाटप करताना चंद्रकांत खंडाईत व इतर.(छाया–अनिल वीर)**

**सातारा :** येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती व रिपब्लिकन सेना यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त शाहु बोर्डिंग येथे अध्ययनार्थीना खाऊ वाटप करून अनोख्ये असे अभिवादन करण्यात आले.

प्रथमतः डॉ.बाबासाहेब आंबेडकर व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास व शाहु बोर्डिंगमध्ये प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

रिपब्लिकन सेना कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष म्हणाले, पृथ्वी ही शेष नागाच्या मस्तकावर उभी नसून कष्टकरी लोकांच्या तळहातावर तरलेली आहे.माझी मैना गावाकडे राहिली माझ्या जीवाची होतेय काहीली !या ओळीत दीन–दलित, मजूर, बहुजन वर्गाच्या व्यवस्था परिवर्तनाचा विडा उचलून त्यासाठी संपूर्ण आयुष्य लेखणीच्या माध्यमातून झिजवणाऱ्या, ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन करत, संघर्षाचा अंगार आपल्या साहित्य कृतीतून रेखाटण करणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे होते.

यावेळी रिपब्लिकन सेना प.महाराष्ट्र अध्यक्ष चंद्रकांत खंडाईत,पदाधिकारी,कार्यकर्ते, विविध संघटनेतील प्रतिनिधी, अनेक क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते, दादासाहेब केंगार, बंधुत्व आदर्श गायिका कल्पना कांबळे,विश्वास सावंत,श्रीरंग वाघमारे, बाळासाहेब सावंत आदी उपस्थित होते.

# सातारा पॅटर्न राज्यभरात आंतरजातीय जोडप्यासाठी सेफहाउस कार्यान्वित करावीत!

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** आंतरजातीय विवाह केल्याच्या रागामधून झालेल्या हल्यात जखमी अमित साळुंखे या युवकाचा मृत्यू झाल्याची घटना मागच्या आठवड्यात संभाजीनगर येथे घडली होती. त्यापार्श्वभूमीवर सातारा पॅटर्नप्रमाणे राज्यात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी तातडीने आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांसाठी मसेफ हाउसफ कार्यान्वित करावीत.अशी मागणी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती मार्फत करण्यात आली आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती गेली ३० वर्षे झाली आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांना पाठबळ देण्याचे काम करते. अशा जोडप्यांना मदत करण्यासाठी सातारा येथे पोलीस दलाच्या सहकार्याने स्नेहआधार हे सुरक्षा निवारा केंद्र देखील चालू केले आहे. आंतरजातीय/धर्मीय विवाह केलेली जोडपी या सुविधेचा लाभ घेत आहेत. महाराष्ट्र राज्य गृहविभागाच्या आदेशानुसार अशा स्वरुपाची सुरक्षा निवारा केंद्र प्रत्येक जिल्ह्यात उभी करणे आवश्यक आहे. औरंगाबादमध्ये असे सुरक्षा निवारा केंद्र असते तर अमित साळुंखे याचा खून टाळता येवू शकला असता. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात विनाविलंब सेफ हाउस कार्यान्वित करावीत.आंतरजातीय विवाह केलेले जोडपे अमित साळुंके आणि विद्या कीर्तीशाही दोघेही संभाजीनगर



**अंनिसची अमित साळुंखे यांच्या घरी सांत्वनपर भेट.(छाया. अनिल वीर)**

पोलिसांच्याकडे सुरक्षा मागणीसाठी गेले असता त्यांना कोणतीही मदत न करता परत पाठवण्यात आले होते. विद्याचे वडील गीताराम भास्कर कीर्तीशाही आणि चुलत भाऊ आप्पासाहेब अशोक कीर्तीशाही हे सतत अमितला जीवे मारण्याच्या धमक्या देत होते. याकडे देखील अक्षम्य दुर्लक्ष करण्यात आले. या स्वरूपाचे दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर कठोर कार्यवाही केली जावी.अशी देखील मागणी अंनिस करीत आहे.

जोपर्यंत अशी यंत्रणा कार्यान्वित होत नाही. तोपर्यंत गरज असलेल्या जोडप्यांना राज्यभरातून सातारा येथे असलेल्या सुरक्षा निवारा केंद्रात पाठवण्यात यावे.अशीही मागणी महाराष्ट्र अंनिसमार्फत डॉ. हमीद दाभोलकर, सम्राट हटकर, मुंजाजी कांबळे,राहुल थोरात, शंकर कणसे, डॉ. दीपक माने, मोहसीन शेख, मधुकर गायकवाड, शंकर बोर्डे, व्यंकट भोसले, फारुख गवंडी, मिलिंद देशमुख, नंदिनी जाधव, रामभाऊ डोंगरे, विनोद वायंगणकर, प्रवीण देशमुख, मुक्ता दाभोलकर, अण्णा कडलास्कर आदींनी केली आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र अंनिसच्या शिष्टमंडळाने औरंगाबाद पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांची भेट घेवून त्यांना निवेदन दिले आहे. त्या निवेदनमध्ये अशा घटने प्रसंगी मदत मागण्यास आलेल्या जोडप्यास कशा प्रकारे समुपदेशन आणि आधार देणे या विषयी पोलीस दलाचे प्रशिक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे ? असे नमूद केले आहे. तसेच असे प्रशिक्षण औरंगाबाद विभागाच्यासाठी आयोजित करावे. असे देखील आवाहन केले आहे. आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी शासन परिपत्रक १९ डिसेंबर २०२३ नुसार संभाजीनगर येथे सेफ हाऊस सुरू करावे. याबाबत आयुक्तांनी संबंधितांना बोलावून व फोनवरून तात्काळ सूचना दिल्या.तसेच अमित साळुंखे याच्या खुनाच्या कटातील बाकीच्या साथीदाराना देखील तातडीने अटक करावी.अशी मागणी देखील करण्यात आली आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शिष्टमंडळाने आंतरधर्मीय विवाह केल्याच्या घटनेतून खून झालेल्या अमित साळुंखेची पत्नी विद्या व कुटुंबीयांची इंदिरानगर परिसरात असणाऱ्या त्यांच्या घरी भेट घेतली. त्यावेळी सुरक्षेसाठी त्यांच्या घरासमोर एक पोलीस नियुक्त करण्यात आला आहे. आरोपी अटकेत आहेत तरीही त्यांना असुरक्षित वाटत आहे. त्या परिसरात आरोपीचे नातेवाईक व जातभाई बहुसंख्यांक असल्याचे दडपण त्यांच्यावर आहे. आपल्या जीवाला धोका आहे.अशी दोघांनीही पोलिसात तक्रार दिली होती. यावर काहीही कार्यवाही झाली नाही. अमितला भोकसले तेव्हापासून आरोपी फरार होते. जवळपास १२ दिवसानंतर त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर आरोपी सापडले. अमितचा खून हा पूर्वनियोजित कट होता. त्यात आणखी काही जण होते. त्यांनाही आरोपी करावे.असं विद्याच म्हणणं आहे.याबाबत पोलीस आयुक्तांशी चर्चा विनिमय करण्यात आला.या शिष्टमंडळात अंनिस सेफ हाऊसचे संचालक शंकर कणसे, राज्य कार्यकारणी सदस्य सम्राट हटकर, मुंजाजी कांबळे, डॉ. दीपक माने, मोहसीन शेख, मधुकर गायकवाड, शंकर बोर्डे, पी .यू आरसूड, जालना, त्याचप्रमाणे छत्रपती संभाजीनगर येथील अंनिसचे जिल्हा कार्याध्यक्ष व्यंकट भोसले, जिल्हा प्रधान सचिव लक्ष्मण जांभळीकर यांचा समावेश होता.

# श्रावणातील सणांची मांदियाळी

श्रावणात पावसाचा लपंडाव सुरू होतो. क्षणात पाऊस तर क्षणात ऊन अशा वातावरणात आणखी एक लगबग सुरू होते, ती निरनिराळ्या सणांची नागपंचमी, मंगळागौर, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन,दुर्गाअष्टमी आणि गोपाळकाला. भारतीय संस्कृती ही सर्व समावेशक संस्कृती आहे. येथील लोक विविध सण साजरे करतात विविध व्रतेही ते करतात यातून कृतज्ञता व्यक्त केली जाते. विविध व्रतामधून नीतिमत्तेचे धडे समाजाला दिले जातात. अशा काही सणांचा आणि व्रतांचा परिचय.



ऋतूंचा राजा वसंत तर सणांचा राजा श्रावण. आनंदाचे व उत्साहाचे भांडार श्रावण येताना घेऊन येतो. हा महिना पूजा व्रतांचा व ज्ञान धर्माचा महिना आहे.यंदा श्रावणाची सुरवात सोमवार पासून होत असून श्रावणात एकुण पाच सोमवार येत आहेत.

श्रावण शुद्ध पंचमीला नागपंचमी म्हणतात. खेड्यातून काय किंवा शहरातून काय सगळीकडे या पंचमीचे स्वागत मोठ्या उत्साहाने होते. झाडांना झोपाळे बांधले जातात, हातामध्ये नवीन चुडा खळखळू लागतो. लाल चुटूक मेंदी हातापायावर रंगू लागते, अवखळ गाणी ओठावर खेळू लागतात, या दिवशी घरोघरी नागाची पूजा होते. खेड्यामध्ये तर सर्वजणी मिळून गाणी गातात, रानामध्ये जाऊन नागोबाची पूजा करतात. शहरात पाटावरती गंध, हळद, केशर, कुंकू, चंदन इत्यादींच्या मिश्रणाने पाच फड्यांचा नागोबा काढून त्याची पूजा करतात. नैवेद्य म्हणून दूध व लहयांचा उपयोग करतात, त्या दिवशी लोखंडी हत्यारे म्हणजे कुऱ्हाडीचा, फावड्याचा वापर करीत नाहीत. नागास इजा होईल म्हणून विळी, सुरी यांचाही घरी उपयोग करीत नाहीत. तवा कडई यांचा वापर न करता त्या दिवशी नागाला पुरणाच्या दिंडाचा (उकडलेल्या) नैवेद्य दाखवतात. उकडलेल्या पाच डाळींच्या वड्यांचा नैवेद्य नागोबाला दाखवतात. साप– नाग हे कृषी मित्र असल्याने त्याचे पूजन करून कृतज्ञता व्यक्त करतात.

सोमवारला विशेष महत्त्व

पंचमीच्या सणाला सुरुवात झाली की पुढे सणांची रांगच लागते. श्रावण महिन्यातील प्रत्येक वाराला वेगळे महत्त्व असते. श्रावणातील सोमवारी शंकराची पूजा करतात. सोमवारी सकाळी लवकर उठून स्नान करून धुतवस्त्र नेसून पंचामृती पूजेची तयारी करून सुवासिनी जवळच्या शंकराच्या देवळात जातात. शंकराची पूजा करतात, घरी येऊन सोमवारची कहाणी वाचतात सबंध दिवसभर कडकडीत उपवास करतात व संध्याकाळी स्नान करून शंकराची पूजा करतात व न बोलता जेवण करतात.

श्रावणातल्या मंगळवार याचे महत्त्व पण वेगळेच आहे. या मंगळवारी मंगळागौरीची पूजा करतात, ही पूजा अन्य सुवासिनी बरोबर करावयाची असते. मंगळागौर विविध रंगीत सुवासिक फुले, फळे, पत्री यांच्या साह्याने पुजतात, देवीची आरती नैवेद्य होतो. त्यादिवशी रात्रभर नाना प्रकारची खेळ खेळून गाणी म्हणून देवीचे स्तवन केले जाते. पूर्वी स्त्रिया नोकरी व्यवसायानिमित्त बाहेर पडत नसत त्याकाळी या व्रतचे खूप महत्त्व होते. पतीला खूप आयुष्य मिळावे म्हणून हे व्रत करण्याची प्रथा आहे.

श्रावण पौर्णिमेला नारळी पौर्णिमा हा सण असतो. जी गावे समुद्र किनाऱ्यावर आहेत तेथे हा सण अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. वरून हा पाण्याचा देव आहे. वरून देवाची म्हणून समुद्राची पूजा करून त्याला नारळ अर्पण करतात. मासेमारी करून जीवन जगणारे कोळी त्यादिवशी समुद्र पूजन करून त्याचा आशीर्वाद मागतात आणि पावसाळ्यात बंद असलेली मासेमारी पुन्हा सुरू करतात.

श्रावणातील आणखी एक सण रक्षाबंधन, रक्षाबंधन दिवशी बहिण भावाला राखी बांधते. तिच्या रक्षणाची जबाबदारी भाऊ घेतो. रक्षाबंधन करून शत्रूलाही आपलेसे करता येते, बंधू भावाचे पवित्र नाते या सणांनी जोडले जाते यालाच भाऊबीज असे म्हटले जाते.

श्रीकृष्ण जयंतीनिमित्त कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे गोकुळाष्टमी होय. श्रीकृष्णाला गरीब, श्रीमंत, सुंदर, कुरूप असा भेद वाटत नसे दहीहंडीच्या दिवशी एकीचे (संघटनेचे) मनोरम दर्शन घडते. बालवयातील श्रीकृष्णाच्या खोड्यांची दहीहंडी हे प्रतीक आहे.

श्रावणातील खास स्त्रियांचा असा आणखी एक वार आहे तो म्हणजे शुक्रवार. त्या दिवशी संध्याकाळी स्त्रियांना बोलवून हळद–कुंकू देतात. साखर घातलेले दूध प्यायला देतात व ताजे भाजलेले गरम गरम फुटाणे देतात. असा हा एकूण श्रावणाचा महिमा, श्रावणाचा महिना हा खास स्त्रियांचा महिना पूजा व्रते आणि पक्वान्नाचे जेवण काही ना काही सर्व महिनाभर चालू असते. ऊन–पावसाचा खेळ खेळणारा हा श्रावण असा आनंदाची व हर्षाचे लेणे घेऊन येतो.

**– केशव चव्हाण**
**सातारा (भाटमरळी)**
**मोबा.९८२२७४४४०१**

# दैनंदिन राशिभविष्य

आज सोमवार, आज सकाळी ७.३० ते ९ यावेळेत राहु काल आहे. या काळात प्रवास, प्रयाण, नविन व्यवहार, सरकारी कामे, महत्त्वाच्या गाठीभेटी इ. कामे वर्ज्य करावीत.

## आजचा दिवस


शके १९४६, क्रोधीनाम संवत्सर, श्रावण शुक्ल प्रतिपदा, सोमवार, दि. ५ ऑगस्ट २०२४, चंद्र – कर्क राशीत दु. ३ वा. २२ मि. पर्यंत नंतर सिंह राशीत, नक्षत्र – आश्लेषा दुपारी ३ वा. २२ मि. पर्यंत नंतर मघा, सुर्योदय– सकाळी ०६ वा. १९ मि. , सुर्यास्त– सायं. १९ वा. १० मि.

नमस्कार आज चंद्र कर्क राशीत दु. ३ वा. २२ मि. पर्यंत रहात असून नंतर तो सिंह राशीत रहाणार आहे. आजचा दिवस सकाळी ११ नंतर चांगला दिवस आहे. आज चंद्र – शुक्र युतीयोग होत आहे. आजचा दिवस सर्व राशींना संमिश्र स्वरुपाचा जाईल.

## राशिभविष्य

**गार्गी ज्योतिषालय**
**ॲड. सौ. स्वप्ना पवार**
(बीएसएल. एलएलएम, ज्योतिष विशारद)
**संभाजीनगर कमानीजवळ, ता. जि. सातारा**






मेष : उत्साह व उमेद वाढेल. नोकरी, व्यवसायातील महत्त्वाची कामे व गुंतवणूकीची कामे दुपारपूर्वी करावीत. दुपारनंतर प्रियजनांच्या अनपेक्षित गाठीभेटी पडतील. दुपारनंतर काहींना अचानक धनलाभ होईल.

वृषभ : दुपारपूर्वी प्रवासाचे योग येतील. कामाचा ताण कमी राहील. दुपारनंतर मानसिक सौख्य लाभेल. आनंदी व आशावादी रहाल. मनोबल व आत्मविश्वास उत्तम असणार आहे. प्रवास सुखकर होतील.

मिथुन : आर्थिकदृष्ट्या दिवस अनुकूल आहे, महत्त्वाची आर्थिक कामे दुपारपूर्वी करावीत. दुपारनंतर काहींना प्रवास संभवतो. जिद्दीने व चिकाटीने कार्यरत रहाल. नातेवाईकांच्या गाठीभेटी पडतील.

कर्क : महत्वाची कामे होतील. आर्थिक व्यवहार दुपारनंतर करावेत. आनंदी वार्ता मिळेल. मानसिक प्रसन्नता लाभेल. दुपारनंतर काहींना अचानक धनलाभाची शक्यता आहे. आनंदी रहाणार आहात.

सिंह : कामाचा ताण असणार आहे. दिवसाची सुरुवात निरुत्साही असली तरी दुपारनंतर उत्साह वाढेल. दैनंदिन कामे दुपारनंतर मार्गी लागणार आहेत. उत्साह व उमेद वाढेल.

कन्या : दैनंदिन कामे शक्यतो दुपारपूर्वी करावीत. दुपारनंतर काहींना निरुत्साह जाणवणार आहे. प्रवास आज नकोत. दुपारनंतर काहींना एखादी मनस्तापदायक घटना घडण्याची शक्यता आहे.

तुला : मानसिक ताकद उत्तम राहील. दुपारनंतर काहींना अचानक धनलाभ होईल. आनंदी व आशावादी रहाल. प्रवास सुखकर होतील. मनोबल व आत्मविश्वास उत्तम राहणार आहे.

वृश्चिक : नोकरी, व्यवसायातील महत्त्वाची कामे दुपारनंतर मार्गी लागणार आहेत. दुपारनंतर विशेष उत्साही रहाल. सार्वजनिक क्षेत्रात मानसन्मानाचे योग येणार आहेत. मानसिक स्वास्थ्य उत्तम लाभेल.

धनु : दुपारनंतर तुमची मानसिकता सुधारेल. दुपारनंतर काहींना उत्साही वाटेल. कामाचा ताण मात्र असणार आहे. प्रवासात काळजी घ्यावी. दैनंदिन कामे दुपारनंतर मार्गी लागतील.

मकर : हितशत्रूवर मात करणार आहात. मनोबल व आत्मविश्वास कमी राहील. दुपारनंतर काहींना मनस्ताप संभवतो. प्रवास शक्यतो टाळावेत. मानसिक अस्वस्थतेचा सामना करावा लागणार आहे.

कुंभ : दुपारनंतर तुमची दैनंदिन कामे मार्गी लागणार आहेत. वाहने सावकाश चालवावीत. मनोधैर्य कमी राहील. खर्च वाढतील. प्रवासात व वाहने चालविताना काळजी व दक्षता घ्यावी.

मीन : दुपारनंतर मानसिक अस्वस्थता जाणवेल. महत्त्वाची कामे आज नकोत. प्रवासात काळजी घ्यावी. आरोग्य जपावे. वाहने सावकाश व लक्षपूर्वक चालवावित. मनोबल कमी राहील.



डॉ. शशिकांत वायदंडे यांच्या सत्कारप्रसंगी सुवर्णा अडसुळे, संतोष जाधव, माणिकराव पाटील व इतर मान्यवर

# घोणशीच्या उपसरपंचपदी डॉ. शशिकांत वायदंडे

## आ. बाळासाहेब पाटील गटाच्या समर्थकांचा निवडीनंतर गुलाल उधळून जल्लोष

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कराड** : घोणशी (ता. कराड) ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी डॉ. शशिकांत वायदंडे यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीनंतर आमदार बाळासाहेब पाटील गटाच्या समर्थकांनी गुलालाच्या उधळणीने जल्लोष केला.

कराड उत्तरचे आमदार बाळासाहेब पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व सह्याद्रीचे संचालक माणिकराव पाटील यांच्यासह सहकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली घोणशी ग्रामपंचायतीचा कारभार सुरू आहे. तीन वर्षांपूर्वी जानाई सह्याद्री ग्रामविकास पॅनेलने विजय मिळवून सत्तांतर घडवले होते. त्यानंतर सरपंचपदी सुवर्णा अडसुळे यांना, तर उपसरपंचपदी अनुक्रमे संजय पिसाळ, सुनीता पाटील यांना काम करण्याची संधी मिळाली होती. सुनीता पाटील यांनी आपल्या उपसरपंचपदाचा राजीनामा दिल्याने त्यांच्या जागी आज डॉ. शशिकांत वायदंडे यांची निवड झाली. निवडणूक अधिकारी म्हणून संतोष जाधव यांनी काम पाहिले. त्यांना ग्रामसेवक अंकुश टेंबरे यांनी सहकार्य केले.

नूतन उपसरपंच डॉ. वायदंडे यांचा सह्याद्रीचे संचालक माणिकराव पाटील यांच्या उपस्थितीत सरपंच अडसुळे व जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नूतन उपसरपंचांचे आमदार बाळासाहेब पाटील, माणिकराव पाटील, पी. डी. पाटील बँकेचे संचालक संभाजी पिसाळ, संजय पिसाळ, सरपंच सुवर्णा अडसुळे, संजय पिसाळ, सुनीता पाटील, रामचंद्र पिसाळ, विश्वासराव पिसाळ, अशोक जाधव, विलास पिसाळ, शिवाजी पिसाळ, निवासराव पाटील, दिनकर वायदंडे, बाळासाहेब वायदंडे, विकास वायदंडे, पंकज पिसाळ आदींनी अभिनंदन केले.

# पाणीपूजन करून निसर्गाच्या ऋणातून उतराई होण्याचा स्वाभिमानी च्या रणरागिणीचा प्रयत्न...



येरळवाडी येथे धरणातील पाणी पूजन करताना स्वाभिमानीचे पदाधिकारी व महिला..

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**वडूज** : खटाव तालुक्यासाठी वरदायिनी ठरलेल्या येरळवाडी धरणाची कुस निसर्गाच्या कृपेने भरली आहे. येरळवाडी धरण तुडुंब भरले असून पाण्याचा विसर्ग सांडव्यावरून सुरू आहे. यामुळे धरण क्षेत्रातील बळीराजा सुखावला आहे. निसर्गाच्या कृपेने येरळा धरण तुडुंब भरल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या रणरागिनींनी खणा नारळाने ओटी भरून निसर्गाच्या कृपेतून उतराई होण्याचा प्रयत्न केला आहे.

गेल्या वर्षी खटाव तालुक्यातील बहुतांशी भागात पुरेसा पाऊस झाला नाही. जमिनीतील पाण्याची पातळी खोलवर गेली आहे शेती पाण्याची आणि पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाली होती. तर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला होता. येरळामाई नदी अक्षरशः कोरडी पडली आहे.

त्यामुळे दुष्काळी खटाव तालुक्याची वरदायिनी असलेल्या येरळवाडी धरणाने तळ गाठला होता त्यामुळे धरण अक्षरशः भेगाळलेल्या स्थितीमध्ये होते. त्यामुळे जनसामान्यांना आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने खटाव तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये पिण्याच्या आणि शेतीपाण्यासाठी संघर्ष उभा केला होता. येरळवाडी मध्ये जिहे कटापूर तसेच उरमोडीचे पाणी सोडून तालुक्याचे मुख्यालय असलेल्या वडूज शहरवासीयांना चांगले शुद्ध पाणीपुरवठा करा आणि शेती पाण्याचा आणि चाऱ्याचा प्रश्नही सोडवा ही मागणी सुद्धा स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि खटाव तालुका पाणी संघर्ष समितीच्या केंद्रस्थानी आणली होती. मात्र कागदी घोडे नाचवणारे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी खटाव तालुका वासीयांच्या मागणीकडे साफ दुर्लक्ष केलं. त्यामुळे तहसीलदार कचेरीसमोर स्वाभिमानी शेतकरी संघटनेसह विविध पक्षांचा समावेश असलेल्या खटाव तालुका पाणी संघर्ष समितीने मोठे जन आंदोलन उभे केले होते.

मात्र तरीही खटाव तालुका दुष्काळात पिण्याच्या पाण्याच्या आणि चाऱ्याच्या प्रश्नामुळे उपेक्षितच राहिला. जनसामान्यांच्या भावना तीव्र असल्यामुळे जनसामान्यांच्या भावना तीव्र असल्यामुळे मोठे जन आंदोलन उभे राहिल्यामुळे उरमोडीचे पाणी कॅनॉलला चालू राहिले त्यामुळे तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी येरळा माई मात्र भेगाळलेल्या अवस्थेमध्ये पोहोचली होती. मात्र आता चांगल्या पावसामुळे ही परिस्थिती बदलली आहे. असे मत राज्य प्रवक्ते अनिल पवार यांनी व्यक्त केले.

लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला दुष्काळामध्ये येरळवाडीमध्ये पाणी सोडून सामान्य माणसांच्या हालअपेष्ट सोडवता आल्या नसल्या तर निसर्गाने मात्र आमच्यावर कृपा केली आहे. गेली अनेक वर्ष खटाव तालुक्यात हुलकावणी देणारा वळवाचा पाऊस पाच ते सहा वर्ष पडलाच नव्हता. मात्र यंदा मुसळधार बरसल्यामुळे खटाव तालुक्यामध्ये ओढे नाले तुडुंब भरलेले आहेत. येरळा धरणाच्या कुशीमध्ये मोठ्या प्रमाणामध्ये पाण्याच्या आवक झाली असून धरण १००% भरले असून सांडव्यावरून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरले असल्यामुळे शहरासह आठ गावातील पाणी योजनांना नवसंजीवनी मिळाले आहे तर शेती पाण्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणात निकाली निघाला आहे. निसर्गमायबाप आमचा खरा वाली अशी भावना महिला शेतकऱ्यांनी उपस्थित केली आहे.असे महिला संघटीका सौ. माधुरी शिंदे यांनी व्यक्त केले.

यावेळी सौ. विद्या पवार, सारिका खाडे, वैशाली शिंदे, मंगल फडतरे, लक्ष्मी देवकर, सूर्यभान जाधव, तालुकाध्यक्ष दत्तू काका घार्गे, शरद खाडे संतोष तुपे, रामदास शिंदे, स्वाभिमानी पक्षाचे अध्यक्ष वैभव पाटील, संतोष बागल, सत्यवान मोहिते, अजय पाटील, विजय देवकर यांच्यासह परिसरातील शेतकरी आणि महिला भगिनी उपस्थित होत्या.

# होमगार्ड भरती प्रक्रिया ६ ऑगस्ट पासून सुरु

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा** : सातारा जिल्हयात होमगार्ड नोंदणीकरीता ऑनलाईन अर्ज केलेल्या सातारा जिल्ह्यातील रहीवासी उमेदवारांना कागदपत्र पडताळणी, शारीरीक पात्रता व क्षमता चाचणी दि. ६ ते ९ ऑगस्ट २०२४ या कालावधीमध्ये दररोज सकाळी ६.३० वाजता पोलीस कवायत मैदान, हजेरीमाळ, सातारा येथे होईल.

उमेदवारांना स. ६.३० ते स. १०.३० या कालावधीमध्येच मैदानात प्रवेश दिला जाईल. ६ ऑगस्ट रोजी २०२४ सर्व महीला उमेदवार. ७ ऑगस्ट रोजी २०२४ पुरुष अर्ज नोंदणी क्र. ०१ ते ३४४३

८ ऑगस्ट २०२४ रोजीपुरुष अर्ज नोंदणी क्र. ३४४४ ते ६८३२ ९ ऑगस्ट २०२४ रोजी पुरुष अर्ज नोंदणी क्र. ६८३३ ते १०५३० या उमेदवारांनी कागदपत्र पडताळणी व शारिरिक क्षमता चाचणी करण्यात येणार आहे.


उमेदवारांनी https://maharashtracdhg.gov.in/mahahg/enrollmentadd.php या संकेतस्थळावरील सविस्तर सुचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

# माण-खटाव विधानसभेसाठी काँग्रेसच्यावतीने मनोज पोळ यांना उमेदवारी देण्याची मागणी

**म्हसवड :** माण-खटाव विधानसभेसाठी काँग्रेसच्यावतीने मनोज पोळ यांना उमेदवारी देण्याची मागणी मार्डी येथे झालेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात करण्यात आली.

मनोज पोळ मार्डी या निवासस्थानी खटाव-माण तालुक्यातील काँग्रेच नेते मा.रणजितसिंह देशमुख,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अध्यक्ष खटाव मा.नंदकुमार मोरे, जि प सदस्य मा.सुरेंद्र गुदगे, पं स सभापती खटाव मा.संदीप मांडवे-साळुंखे तसेच माण तालुक्यातील सर्व गावातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. मा.स्व.सदाशिवराव पोळ(तात्या) यांनी तालुक्यातील सर्वांना एकत्र घेऊन तालुक्याचे राजकारण केले,तात्यांनी सर्वसामान्य लोकांच्या हिताची कामे केली सर्वसामान्य लोकांना आमदार केले त्यांचा च वारसा चालवणारे मा.मनोजदादा पोळ यांना महाविकास आघाडी मधून उमेदवारी मिळावी अशी कार्यकर्त्यांनी भावना व्यक्त केल्या.

# कृष्णाकाठच्या विकासाचे शिल्पकार : सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले (आप्पासाहेब)



सातारा जिल्ह्यातील कराड तालुका आणि सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्याच्या कृष्णाकाठचा परिसर समृद्ध आणि संपन्न आहे. या भागात विकासाचे नंदनवन उभे राहिले असून, या विकासाचे खरेखुरे शिल्पकार म्हणून सहकारमहर्षी जयवंतराव भोसले (आप्पासाहेब) यांना ओळखले जाते. कृष्णा कारखाना, कृष्णा बँक, कृष्णा हॉस्पिटल, कृष्णा अभिमत विद्यापीठ अशा संस्थांच्या उभारणीतून त्यांनी एकाचवेळी या भागात सहकार, उद्योग, आर्थिक, आरोग्य, शिक्षण अशा क्षेत्रात क्रांती घडवून आणली. ज्यामुळेच आज कृष्णाकाठी विकासाचे नंदनवन दिसून येत आहे.

कराड तालुक्यातील रेठरे बुद्रुक येथील प्रगतीशील शेतकरी माधवराव मोहिते यांना तीन मुले. थोरले वसंतराव, मधले यशवंतराव व धाकटे जयवंतराव. पुढे वसंतराव मूळ घराण्यातच राहिले, शेतीत रमले. तर यशवंतराव बडोद्याला जिजाबा मोहितेंकडे आणि जयवंतराव आजोळी भोसले घराण्यात दत्तक गेले. २२ डिसेंबर १९२४ रोजी जयवंतराव यांचा जन्म झाला. शालेय व महाविद्यायीन शिक्षणानंतर त्यांनी वकिलीची पदवी घेतली. आप्पासाहेबांनी दूरदृष्टीने काळाची पाऊले ओळखत, या भागातील शेतकऱ्यांचे दैन्य आणि दारिद्र्य नष्ट करण्यासाठी आणि सहकारातून समृद्धी आणण्यासाठी काय करता येईल, याचा विचार सुरू केला. याचवेळी त्यांनी आपल्या अन्य सहकाऱ्यांच्या मदतीने कृष्णा सहकारी साखर कारखाना उभारण्याचा निर्णय घेतला. अनेक भौगोलिक, राजकीय अडचणींचा सामना करून त्यांनी कृष्णा सहकारी साखर कारखाना उभा केला. १९६१ मध्ये आप्पासाहेब कृष्णा कारखान्याचे चेअरमन झाले आणि पुढची सलग ३० वर्षे आपल्या कार्यकर्तृत्वाने त्यांनी सहकारात एक मानदंड निर्माण केला.

त्याकाळात आप्पांनी आखलेल्या धोरणांमुळे आशिया खंडातील सर्वात मोठा आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम कारखाना अशी कृष्णा कारखान्याची ओळख साऱ्या जगाला झाली. कारखान्याच्या उभारणीमुळे परिसरातील हजारो हातांना काम मिळाले. विधायक दूरदृष्टी ही आप्पासाहेबांची खासियतच होती. ट्रॉलीमधील ऊस क्रेनच्या साहाय्याने उचलून फिडिंग टेबलवर ठेवणारे युनिट महाराष्ट्रात सर्वप्रथम आप्पांनी कारखान्यात आणले. आप्पांनी देशातील पहिली डिस्टलरी, पहिले कंट्री लिकर, इंडियन मेड फॉरेन लिकर, सिटोन अशा उपपदार्थांच्या निर्मितीचे प्रकल्प सुरू केले.

आप्पासाहेबांनी कारखान्याच्या पुढाकारातून १७ उपसा जलसिंचन योजना उभ्या केल्या. ज्यामुळे कृष्णेच्या परिसरातील ७२,००० एकर जमिनीने हिरवागार शालू पांघरला. यामुळे गावागावात आर्थिक सुबत्ता आली. टायरच्या बैलगाड्यांनी ऊसवाहतूक करण्याची कल्पना महाराष्ट्रात सर्वप्रथम आप्पांनीच आणली. शेतकऱ्यांच्या हितासाठी आप्पांनी अनेक सहकारी संस्था स्थापन केल्या आणि सक्षमपणे चालविल्या. शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी कृष्णा सहकारी बँक सुरू केली. तसेच बेरोजगारांना रोजगार मिळावा यासाठी ग्रामीण विकास विश्वस्त संघ छापखाना सुरू केला.

शेतकऱ्यांची पोरं शिकली पाहिजेत, यासाठी शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. एवढ्यावरच न थांबता त्यांनी आगाशिवच्या डोंगरपायथ्याला कृष्णा हॉस्पिटल सुरू करून, लाखो रूग्णांवर अद्ययावत पद्धतीचे उपचार माफक दरात उपलब्ध करून अनेकांना जीवदान दिले. मेडिकल कॉलेज स्थापन करून, चांगल्या पद्धतीने चालवून कृष्णा अभिमत विद्यापीठाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर पोचविले. आप्पासाहेबांचे हे सारे काम बघून प्रभावित झालेले तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले यांनी आप्पासाहेबांना विधानपरिषदेचे सदस्यत्व दिले आणि आप्पा आमदार झाले.

आप्पांनी स्थापन केलेले कृष्णा हॉस्पिटल केवळ कोरोनाग्रस्त रूग्णांवर उपचार सुरू गप्प बसले नाही, तर कोरोनाच्या लढाईत हिरीरीने भाग घेत अनेक जागतिक स्तरावरील उपक्रमात भागिदारीही केली. सहकार, शिक्षण, आरोग्य, कृषी, जलसिंचन अशा अनेकविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या आप्पासाहेबांना ५ ऑगस्ट २०१३ रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी देवाज्ञा झाली आणि अखंड कृष्णाकाठ पोरका झाला. पण त्यावेळी आप्पासाहेबांच्या थोर कार्याचा वसा आणि वारसा स्वीकारलेले त्यांचे पुत्र तथा कृष्णा कारखान्याचे विद्यमान चेअरमन डॉ. सुरेश भोसले (बाबा), नातू तथा कृष्णा बँकेचे चेअरमन डॉ. अतुल भोसले (बाबा) आणि विनायक भोसले (बाबा) यांनी आप्पांनी घालून दिलेल्या पाऊलवाटेवरून चालत, लोकांच्या जीवनात पुन्हा एकदा स्थैर्य आणले आहे.

आज आप्पासाहेब नसले तरी त्यांनी उभ्या केलेल्या संस्थांच्या माध्यमातून आणि त्यांच्या कार्यातून ते आजही प्रत्येकाच्या मनामनात, हृदयात जिवंत आहेत, अमर आहेत.

**– प्रतिनिधी**

### महाराष्ट्रभूषण लोकशाहीर पुंडलिक फरांदे स्मृतिदिन मंगळवारी अभिवादन कार्यक्रम

**सातारा** : येथील कामाठीपुरातील संत गाडगेमहाराज सभागृहात महाराष्ट्रातील थोर सत्यशोधक लोकशाहीर तथा फुले-शाहु-आंबेडकरी विचारांचे प्रचारक महाराष्ट्रभूषण लोकशाहीर पुंडलिक फरांदे यांच्या स्मृतिदिनानिमित्त मंगळवार दि.६ रोजी सकाळी १० वा.अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.


## रोटरी क्लब ऑफ सातारा कॅम्प ट्रस्ट- सातारा
## जाहिर निविदा सूचना

रोटरी क्लब ऑफ सातारा कॅम्प ट्रस्ट पी-७५ नविन औद्योगिक वसाहत सातारा येथील दुसऱ्या मजल्यावरील ११८९ स्केअर फूटचे आर.सी.सी. बांधकाम करणेकरिता परवानाधारक बांधकाम व्यावसायिकांकडून मटेरिअलसहित व मजूरी दरावर निविदा मागवणेत येत आहेत. सदर निविदा दि.१२/०८/२०२४ पर्यंत दु. ३.०० वाजेपर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयात सादर कराव्यात त्यानंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. निविदाबाबतचे सर्व अधिकार रोटरी क्लब ऑफ सातारा कॅम्प ट्रस्ट या संस्थेने स्वंतःकडे राखून ठेवले आहेत.

**रो. डॉ. जवाहरलाल शाह**
**चेअरमन**
रोटरी क्लब ऑफ सातारा कॅम्प ट्रस्ट





## फलटण नगर परिषद, फलटण, जि.सातारा

कार्यालय क्रमांक : ०२१६६-२२२३२५ टोल फ्री क्रमांक : १९१३
: ०२१६६ -२२१७६७

Email ID-cophaltan@gmail.com.
Web side : www.phaltanmunicipalcouncil.org

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र.फनप/विद्युत/१०२२//२०२४ दि. १/८/२०२४

## जाहीर ई-निविदा सूचना

फलटण नगर परिषद, फलटण जि. सातारा यांचे अधिनस्त विद्युत विभागाकडील सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता खाली नमूद केलेल्या कामाची नोंदणीकृत कंत्राटदाराकडून वार्षिक विद्युत कामाकरिता B-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे ऑनलाईन मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशिल | अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२४-२५ सालाकरीता रस्त्यावरील स्ट्रीट लाईटच्या देखभाल दुरुस्ती करणे, सर्व्हिस वायर बदलणे, लाईन फ्लॉट काढणे, स्ट्रीट लाईट चालू बंद करणे, हायमास्ट पोल दुरुस्ती करणे, नगरपरिषदेचे आवश्यकतेनुसार इलेक्ट्रीक साहित्य पुरविणे इ. कामे नगरपरिषदेच्या सूचनेनुसार करणे. | ५५,००,०००/- | ५५,०००/- | ११८०/ | एक वर्ष व पुढील दर मंजूर होईपर्यंत |

सदर कामाचे तपशील व इतर शर्ती व अटी दिनांक १/०८/२४ पासून शासनाच्या https:mahatenders.gov.in या वेबसाईटवर पहावयास मिळेल.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
फलटण नगरपरिषद, फलटण

## यात्रा भक्तीसाठी की दहशतीसाठी?

**यात्रेच्या मार्गावरची मशीद पडदे लावून झाकण्याची गरज का पडते? एकीकडे पोलीस यात्रेकरूंवर पुष्पवृष्टी करत असताना दुसरीकडे तेच यात्रेकरू पोलिसांचं वाहन का फोडतात? केवळ हॉर्न वाजवला, धक्का लागला म्हणून दंगली का उसळतात? वर्षानुवर्षं गुण्यागोविंदाने होणारी कावड यात्रा गेल्या काही वर्षांत एवढी हिंसक का होऊ लागली आहे?**

महाराष्ट्रात जशी वारी तशीच उत्तर भारतात कावड यात्रा. इथे विठ्ठलाच्या दर्शनाची ओढ, तर तिथे जय भोले की हा जप इथे माऊली आणि तिथे भोले. पण गेल्या काही वर्षांत हे भोले वारंवार उग्र रूप धारण करताना, भाररस्त्यात तांडव करताना दिसू लागले. दिल्ली, उत्तर प्रदेश, बिहार, उत्तराखंड, हरियाणा राजस्थानमध्ये रस्तोरस्ती कावड यात्रींची दहशत पसरू लागली. आज परिस्थिती अशी आहे की रस्त्यांवर यात्राकाळात दहशतीचं सावट असतं. गाड्या फोडल्या जाणं, वाहनचालकांना बेदम मारहाण होणं सामान्य घटना ठरू लागतात. यात्रेकरूंच्या बाजूने जाताना साधा हॉर्नही वाजवणं महागात पडतं. या काळात दंगलसदृश वातावरण असणारंच अशी खूणगाठ रहिवाशांनी बांधलेली असते. कावड यात्रेत कावडीएवढ्याच सर्रास हॉकीस्टिक आणि बेसबॉल बॅट दिसू लागल्या आहेत. आपण काहीही केलं, तरीही पोलीस किंवा कोणतीही यंत्रणा आपलं काहीही बिघडवणार नाही, असं कावड यात्रींना का वाटतं?

यात्रा हा केवळ शरीराने नव्हे, तर मनानेही आपल्या आराध्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न. वाटेत फारतर भजन, कीर्तन होणं अपेक्षित असतं. पण कावड यात्रेत काय दिसतं? ठणाणा हॉर्न वाजवत, इंजिनचे कर्कश आवाज काढत, ट्रिपल सीट, हेल्मेट न घालता निघालेल्या मोटारसायकलस्वारांचा जत्था. तोंडी जय भोले की ही घोषणा आणि हाती असलेले भगवे झेंडे वगळले तर हे जत्थे धार्मिक भावाने निघालेले असावेत असं अजिबात वाटत नाही. आमच्या वाटेत याल तर खैर नाही, हा इशाराच त्यांच्या वर्तनात दिसतो.

कावड यात्रेची मूळ संकल्पना अशी की गंगोत्री, नीलकंठ, ऋषिकेश, गोमुख येथील घाटांवरून गंगेचं पाणी कावडीत भरून घ्यायचं आणि वाटेत येणाऱ्या महत्त्वाच्या मंदिरांत कावडीतून जलाभिषेक करत चालत आपापल्या घरी जायचं. ६०-७० ते १००-१५० किलोमीटर किंवा त्याहूनही जास्त अंतर हे कावडिये दरवर्षी कापतात. या यात्रेची एक विशिष्ट संस्कृती आहे आणि त्याभोवती अर्थकारणही विणलं गेलं आहे. अनेकदा यात्रा मुस्लीमबहुल वस्त्यांतून जातात. दरवर्षी या वस्त्यांत त्यांच्या खाण्या-पिण्याच्या गरजा, हे मुस्लीम बांधवच भागवत. यंदा मात्र फळांच्या आणि अन्य खाद्यपदार्थांच्या गाड्यांवर मालकाचे पूर्ण नाव लिहिण्याचा फतवा एका पोलीस ठाण्याने काढला. कारण काय, तर यात्रा भ्रष्ट होऊ नये म्हणून. यामागचा हेतू वेगळा सांगण्याची गरज नव्हतीच. पुढे संपूर्ण उत्तर प्रदेश आणि पाठोपाठ उत्तराखंडमध्येही हा ङ्गनियमम लागू करण्यात आला. हा हिंदू- मुस्लिमांत फूट पाडण्याचा, मुस्लिमांवर आर्थिक बहिष्कार टाकण्याचा प्रयत्न असल्याची टीका देशभरातून झाली. नंतर न्यायालयाच्या आदेशामुळे हा फतवा मागे घ्यावा लागला, हा भाग वेगळा. पण यातून या दोन्ही राज्यांतील सरकारांचे हेतू स्पष्ट झालेच. एवढे झाल्यानंतरही हरिद्वारमध्ये यात्रा मार्गातली मुस्लिमांची धार्मिक स्थळं पडदे लावून झाकण्यात आली. या कृत्याची जबाबदारी घेण्यास कोणतीही यंत्रणा वा संस्था पुढे आली नाही. त्याची छायाचित्र व्हायरल झाल्यानंतर पडदे काढण्यात आले. आमच्या धार्मिक स्थळांच्या केवळ दर्शनाने यात्रेचं पावित्र्य भंग होणार होतं का, असा प्रश्न तिथल्या मुस्लीम समुदायाला पडला.

उत्तर प्रदेशातील गाझियाबाद जिल्ह्यातील घटना- मुरादनगर परिसरात यात्रेकरूंच्या आणि समान्य रहिवाशांच्या वाहनांची प्रचंड गर्दी होती. त्यातच कावड घेऊन पायी निघालेलेही होते. आकिब अहमद नावाचा तरुण आपल्या नातेवाईकांना मेरठला सोडण्यासाठी चारचाकी वाहनातून निघाला होता. त्याच्या कारचा धक्का यात्रेकरूंपैकी कोणाच्या तरी बाइकला लागला, असा यात्रेकरूंचा दावा आहे. आपल्याला असं काही झाल्याचं आठवत नाही, असं आकिबचं म्हणणं. तिथून पुढे दिल्ली-मेरठ हायवेवरच्या टोल नाक्यापर्यंत कावडियांनी त्याचा पाठलाग केला. टोलवर अनेक कावडिये रस्ता अडवून उभे होते. त्यांनी आकिबला अडवलं. त्याचं नाव विचारलं. गाडीतून बाहेर खेचलं आणि हॉकीस्टिक व काठ्यांनी बेदम मारलं. त्याच्या मानेवर चाकूने वार केले. गाडी पूर्णपणे फोडून टाकली.

मुजफ्फर नगरमध्ये एका कारचा कावडीला धक्का लागल्याचा दावा करत मालकाला मारहाण करण्यात आली. गाडी फोडण्यात आली. पोलीस घटनास्थळी पोहोचले तेव्हा कळलं की कावड फुटली नव्हती. केवळ धक्का लागला म्हणून एवढं आकांडतांडव?

रुरकीमध्ये एक ई-रिक्षा चालक कावडियांच्या गर्दीतून वाट काढत प्रवाशाला बसविण्याचा प्रयत्न करत होता. आमच्या जवळून का गेला, या रागातून कावडियांनी त्याला क्रूरपणे मारहाण केली. रिक्षा उलटवली आणि तोडफोड केली. पोलिसांच्या समोरही हे तथाकथित भोले गाडी वर काठ्यांनी प्रहार करत असल्याच्या चित्रफिती प्रसारित झाल्या.

हा सारा हिंसाचार, नासधूस कावडिये स्वतःच चित्रित करतात आणि समाजमाध्यमांवर पोस्ट करतात. प्रत्येक घटनेच्या चित्रफिती उपलब्ध आहेत. सर्व दृश्यांत नासधूस करणाऱ्यांचे चेहरे स्पष्ट दिसत आहेत. पण एरवी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी आग्रही असलेल्या बुलडोझर बाबांनी यापैकी कोणावरही कठोर कारवाई केल्याचं ऐकिवात नाही. पोलीस येतात, समज देतात, ताब्यात घेतात आणि सोडून देतात. धर्माच्या नावाखाली सुरू असलेल्या ह्या हुल्लडबाजीला, हिंसाचाराला पोलिसांचं संरक्षण असल्यामुळेच कावडिये अनिर्बंध आहेत, हे स्पष्टच आहे.

कावडयात्री नशा करताना आढळणंही अगदी समान्य झालं आहे. शंकराचे भक्त अनेकदा भांग प्राशन करतात. ती परंपराच आहे, मात्र आता यात्रेत मद्य, चरस, गांजा, अफूचं सेवन करणाऱ्यांचं प्रमाण वाढलं आहे. त्यांना हे अमली पदार्थ पुरविणाऱ्यांचंही एक जाळं यात्रा मार्गावर तयार झालं आहे. नशेच्या भरात हिंसाचाराला अधिक चालना मिळते.

पारंपरिकरित्या दोन-चार घागरी भरून साध्याशा कावडीला त्या बांधून यात्रा केली जात असे. आता घागरींची संख्या वाढली आहे आणि स्वरूपही पालटलं आहे. काही कांवडिये क्षमतेपेक्षा जास्त अवजड कावड वाहून नेतात. आम्ही एक क्विंटलची कावड घेतली आहे, असं अभिमानाने सांगतात, पण अशाने दमछाक आणि पर्यायाने चिडचिड अधिक होते आणि त्यातूनच हिंसक प्रवृत्ती वाढते. सर्वच कावडिये गुंड प्रवृत्तीचे नाहीत. जे खरोखरच भक्तिभावाने यात्रेत सहभागी होतात, त्यांच्या मनात अशा दंगेखोर कावडियांबद्दल प्रचंड राग आहे. अशा तरुणांमुळे यात्रा बदनाम होते, अशी खंत ते व्यक्त करतात. वर्षानुवर्षांपासून उत्तर भारतातल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग असलेली, हिंदू- मुस्लीम बंधुतेचे दर्शन घडवणारी कावड यात्रा आज विकृत आनंदाचं, झुंडशाहीचं, हिंसाचाराचं, द्वेशाचं प्रतीक ठरू लागली आहे. आपली संख्या मोठी आहे म्हणजे आपल्याला कोणी काही करणार नाही, अशी खात्री हे त्यामागचं कारण आहे. सरकार आपल्या बाजूने आहे, हा विश्वासही कारणीभूत असू शकतोच. तो अधिक बळकट करण्याचं काम पोलीस आणि प्रशासन करताना दिसतं. बंधुत्वाचा, एकमेकांच्या आधाराने पुढे जाण्याचा संदेश देणारी ही यात्रा आता दहशतीचं सावट पसरवताना दिसू लागली आहे.

## विधानसभेचे पडघम



महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका दिवाळीत होतील, असे अपेक्षित आहे. राज्यातील निवडणुका भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवारगट व सहयोगी यांच्या महायुती आणि राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना व सहयोगी पक्ष यांच्या महाविकास आघाडी अशी ही लढत अपेक्षित आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत महायुती आणि महाविकास आघाडी अशी सरळ लढत महाराष्ट्रात झाली. आता आणखी दोन महिन्यांनी विधानसभेच्या निवडणुका होतील. या निवडणुकीची तयारी आता सुरू झाली आहे. प्रत्येक राजकीय पक्षाला स्वत:चे अस्तित्व शोधायचं आहे, टिकवायचं आहे. विधानसभा निवडणुकीत कोणाचं बळ किती आहे याची अजमावणी केली जाणार आहे.

माझे कोकण संतोष वायंगणकर

महायुती आणि महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांना सर्वांना स्वतःचं अस्तित्व आणि वर्चस्व सिद्ध करायचं आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात कोणाचे किती आमदार निवडून येणार याची चाचपणी सुरू केली असून आपल्याच पक्षाचे जास्तीत जास्त आमदार असले पाहिजेत, निवडून आले पाहिजेत. यासाठी चाचपणी सुरू आहे. शेवटी ही राजकीय स्पर्धा आहे. या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रत्येक पक्ष आपली बार्गेनिंग पॉवर सतत वाढवण्याचा प्रयत्न करणारच. त्याच प्रयत्नांची रंगीत तालीम सध्या राजकीय पक्ष आणि त्यांचे नेते करताना दिसतात. सध्याचं हे आघाडी, युतीचं राजकारण आहे. पूर्वीसारखी एकाच पक्षाच वर्चस्व आणि त्यांची सत्ता हे राजकीय गणित बिघडलं आहे. बेरजेचे राजकारण सध्या सुरू आहे. त्यामुळे सत्तेच राजकारण करताना साथ-साथचा नारा देत निवडणुकांना सामोरे जाण्याचा प्रयत्न होत आहे.

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत इतर प्रांतापेक्षा जनतेने वेगळा कौल दिलेला. कोकणातील जनता, भाजपा, शिंदेसेना आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीच्या बाजूने राहिल्याचे चित्र आपणाला पाहायला मिळाले. लोकसभा निवडणुकीत महायुतीत महाराष्ट्र नवनिर्माण सेना होती; परंतु महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त जागा लढवणार असल्याचे घोषित केले आहे. अर्थात सध्याच्या महायुती आणि महाविकास आघाडीच्या राजकारणात कधी कसे व कुणाशी समझोता होईल हे सांगण कठीण आहे. मात्र, महाराष्ट्रातील कोकण प्रांतातही विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. कोकणातील रायगड, पालघर, ठाणे, कल्याण व रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा निवडणुकीत महायुतीला चांगलं यश मिळालेलं असल्याने कोकणात महायुतीला विधानसभेतही जास्तीत जास्त जागा निवडून आणण्यासाठी महायुतीचे प्रयत्न आहेत. मात्र विधानसभेची निवडणूक लढवायची तर त्याची बांधणी अगोदरपासूनच करावी लागते. तशारीतीने मतदारसंघ बांधणी पाच वर्षे केली जाते. मतदारसंघातील ग्रामस्थांशी संवाद, विविध योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातात.

सामान्य जनतेशी नेहमीचा संपर्क, गाठी-भेटी, संवाद यामुळे साहजिकच निवडून येण्यासाठी आवश्यकती सर्व तयारी केली जाते. त्या प्रयत्नांना यश येत गेलं की निवडणुकीचा आखाडा अधिक सोपा होत जातो. जनतेशी कनेक्टीव्हीटी अधिक महत्त्वाची ठरते. सध्या त्याच पद्धतीने सर्वांचेच प्रयत्न सुरू आहेत. विधानसभा निवडणूक या लोकसभेत ज्या मतदारसंघात मिळालेलं मताधिक्याचा विचारही त्यामध्ये असणार आहे. यामुळे यावेळच्या विधानसभा निवडणुका या वेगळया पद्धतीने लढविल्या जातील. रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्यात तर विधानसभा निवडणुकीत काही मतदारसंघात अनेक इच्छुक आहेत. दावे, प्रतिदावेही केले जात आहेत. रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघांचे शिवसेनेचे पराभूत खासदार विनायक राऊत विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असल्याची चर्चा आहे. माजी खासदार विनायक राऊत यांना लोकसभेतील पराभवानंतर विधान परिषदेत संधी मिळेल असे वाटले होते. तसे प्रयत्नही विनायक राऊत यांनी केले; परंतु मिलिंद नार्वेकर यांनी विधान परिषदेची उमेदवारी मिळवली आणि विजयीही झाले. यामुळे विनायक राऊत सावंतवाडी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छुक होते. मातोश्रीतूनही त्यांना ग्रीन सिग्नल मिळाला होता, तर रत्नागिरी विधानसभा मतदारसंघात राजापूरचे शिवसेना आमदार राजन साळवी यांना उभे करून विनायक राऊत राजापूर विधानसभा निवडणूक लढवू शकतात असे म्हटले जाते. विनायक राऊत विधानसभेत जाण्यासाठी उत्सूक आहेत. कुडाळ-मालवण मतदारसंघांतून गेली पाच वर्षे विद्यमान आमदार वैभव नाईक यांच्यापेक्षा एक पाऊल पुढे माजी खासदार निलेश राणे यांचे राहिले आहे.

या मतदारसंघात त्यांचा दांडगा लोकसंपर्क आहे. लोकसभा निवडणुकीत कुडाळ-मालवण मतदारसंघात २८ हजारांचे भाजपाला मताधिक्य राहिले आहे. विकासकामांच्या बाबतीतही निलेश राणे कोट्यवधींची काम पालकमंत्री रवींद्र चव्हाण व खा. नारायण राणे यांच्या माध्यमातून या मतदारसंघात झाली आहेत. सावंतवाडी मतदारसंघात शिक्षणमंत्री दीपक केसरकर हे पुन्हा निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. मात्र, या सावंतवाडी मतदारसंघात माजी आमदार राजन तेली, विशाल परब या मतदारसंघातून इच्छुक आहेत. महायुतीकडून दीपक केसरकर की अन्य कोणी अशी चर्चा होत असताना उबाठाकडून विनायक राऊत नसतील तर कोण उमेदवार असणार यासंबंधी चर्चा होत असताना निवडणुकीदरम्यान बऱ्याच राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कणकवली-देवगड-वैभववाडी मतदारसंघात विद्यमान आमदार नितेश राणे यांनी जनसंपर्क आणि विकासकामे या दोन्ही बाबतीत अग्रक्रम राखला आहे. या मतदारसंघात काँग्रेसकडून माजी सभापती नागेश मोरये इच्छुक असल्याचे जाहीर केले आहे. राजापूर मतदारसंघातून महायुतीकडून कोण निवडणुक लढवणार यासंबंधीही अनेक नावांची चर्चा होत आहे. विधानसभा निवडणुका जस-जशा जवळ येतील तशी कोकणात आणखी काही नावं चर्चेत येतील. निवडणूक म्हटली की चर्चा तर होणारच.

## निवडणुकीपुढे शेतकरी आत्महत्येचा प्रश्न नगण्य?

आज भारतात आपण औद्योगिक क्षेत्राची आघाडी आणि शेती क्षेत्राची पीछेहाट अशा विसंगतीत जगत आहोत. औद्योगिक क्षेत्रात भरमसाट वाढ होत आहे, आंतरराष्ट्रीय नाणे निधीने २०२४-२५ चा भारताचा विकासदर पूर्वी व्यक्त केलेल्या ६.८ टक्क्यांवरून वाढवून सात टक्के केला आहे. शेअर बाजारात शेअरच्या निर्देशांकाने प्रथमच शिखरावर पोहोचून ८१ हजार अंकांची पातळी पार केली आहे. समभाग भांडवल बाजारात विदेशी गुंतवणुकीचा ओघ वाढत आहे. तंत्रकुशल तरुण वर्ग आपल्या उच्च पगाराच्या आधारावर भांडवल बाजारात गुंतवणूक करीत आहे. नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या मे २०२४ च्या आकडेवारीनुसार देशातील १० गुंतवणूकदारांपैकी चार म्हणजे ४० टक्के गुंतवणूकदार ३० वर्षे वयाच्या खालील आहेत आणि ४० वर्षे वयाच्या आतील गुंतवणूकदारांचा एकूण गुंतवणुकीतील हिस्सा ७० टक्के आहे. तरुणांचे प्रमाण विशेष करून २०१८ पासून वाढत आता त्या वर्षापेक्षा दुप्पट झाले आहे. ही सगळी औद्योगिक क्षेत्रातील चंगळ आहे.

आपण शेतीकडे पाहू गेल्यास तेथील वृद्धीदर २०१७-१८ च्या ६.६ टक्क्यांवरून २०१८-१९ मध्ये २.१ पर्यंत घसरला; २०२०-२१ आणि २०२१-२२ मध्ये हा विकासदर अनुक्रमे ३.३ आणि ३.१ टक्क्यांपर्यंत कमी झाला. २०२३-२४ मध्ये कृषी वृद्धीदर १.८ टक्क्यापर्यंत कमी झाला. यात सिंचन असलेल्या प्रदेशांचा हिस्सा बाजू केल्यास कोरडवाहू प्रदेशांचे योगदान नाममात्र शिल्लक राहते. अशा प्रदेशांपैकी एक प्रदेश विदर्भ आहे.

विदर्भातील शेतीच्या हवामानानुसार दोन भाग आहेत: प्रथम वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली आणि चंद्रपूर म्हणजे प्रशासकीय नागपूर विभाग. हा धान (तांदूळ) पट्टा आहे. त्याला पावसाळ्यात पश्चिमेकडून अरबी समुद्राचा आणि हिवाळ्यात पूर्वेकडून बंगालच्या उपसागराकडून पाऊस मिळतो. त्यातून दोनदा पिके येतात म्हणून या भागात शेतीचे इतर प्रश्न असले तरी शेतकरी आत्महत्या होत नाहीत. दुसरा प्रशासकीय विभाग यवतमाळ, वाशीम, बुलढाणा, अकोला आणि अमरावती जिल्ह्याचा-अमरावती विभाग किंवा वऱ्हाड (बेरार). याला प्रामुख्याने मान्सूनचा पश्चिमेकडील पाऊस मिळतो. त्यावर कापूस, सोयाबीन ही खरिपाची पिके एकदाच येतात. कापूस ऑक्टोबरपासून फेब्रुवारीपर्यंत वेचतच राहावा लागतो. म्हणून एकच पीक येते.

वऱ्हाडातील जमीन काळी कसदार. या मातीचे शास्त्रीय नावच ब्लॅक कॉटन सॉइल असे आहे. ब्रिटिश गॅझेटियरनुसार हा कापूस गंगेवर नेऊन ढाक्याला पाठवला जाई व त्यापासून ढाक्याची मलमल बने. ब्रिटिशांनी भारतातील सर्वात जास्त दरएकरी जमीन वऱ्हाडवर महसूल आकारून शोषण केले. १८६५ मध्ये अमेरिकेत गुलामगिरीच्या प्रश्नावर यादवी युद्ध झाल्यामुळे तेथील कापूस ब्रिटिश कापड गिरण्यांना मिळणे बंद झाले. मग कापूस सातत्याने मिळत राहावा म्हणून वऱ्हाड (बेरार) प्रदेश सगळ्या साम्राज्यात सोयीचा वाटला व त्यांनी वऱ्हाडच्या कापसाच्या लागवड-प्रक्रिया-परिवहन आणि निर्यात यासाठी भरपूर खर्च केला. अमेरिकेन कापूस ब्रिटनला पुन्हा मिळेपर्यंत वऱ्हाडातील कापसाच्या किमती चौपटीने वाढून निर्यातीद्वारे तो वऱ्हाडचा सुवर्णकाळ ङ्गवऱ्हाड आणि सोन्याची कुऱ्हाडफ बनला. ते युद्ध संपल्यानंतर वऱ्हाडातील कापसाचा, शेतीचा आणि शेतकऱ्यांचा जो ऱ्हास सुरू झाला तो आता २०२४ पर्यंत!

स्वातंत्र्य, द्विभाषिक मुंबई आणि महाराष्ट्र १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यावर १९५६ मध्ये विदर्भ द्विभाषिक मुंबईत आला आणि १९६० मध्ये महाराष्ट्रात सामील केला गेला. विदर्भातील सिंचन निर्माण करण्याचा प्रयत्न, राज्यातला एक मोठा कापूस प्रदेश म्हणून झालाच नाही. १९८४ च्या दांडेकर समितीच्या अहवालातही महाराष्ट्रात सगळ्यात जास्त अनुशेष विदर्भाचा आणि त्यात सगळ्यात जास्त अनुशेष अमरावती विभागातील सिंचनाचा. तो अहवालही तत्कालीन राज्य शासनाने स्वीकारला नाही. तशीच वाट २००० च्या भुजंगराव कुलकर्णी समितीच्या अहवालाची लागली.


गेल्या २४ वर्षांत (२००१ पासून) अमरावती विभागात (पश्चिम विदर्भ) एकूण २७,२३४ आत्महत्या झाल्याची नोंद आहे. आतापर्यंत देशात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या महाराष्ट्र राज्यात होतात असे म्हटले जाते. प्रत्यक्षात त्या पश्चिम महाराष्ट्रात नाही तर अमरावती विभागात होतात व तितकेच परिवार उघड्यावर पडतात हे भीषण सत्य नजरेआड होता कामा नये.

पेरण्या सुरू होण्यापूर्वीच अमरावती विभागात शेतकऱ्यांना आत्महत्या करणे भाग पडावे पण सत्ताधारी पक्षांसह सगळ्याच पक्षांना निवडणूक-ज्वराने पछाडावे, अशी विसंगती स्पष्ट दिसत आहे. सरकार कोणाचेही असो, अमरावती विभागाच्या कृषी विकासाचा सर्वांगीण प्रश्न मोठे नियोजन व विशेष निधी खर्च करून सोडवणे अत्यंत आवश्यक आहे.

## देहच मी हा भ्रम

आपण कोण, आपले कर्तव्य काय, हे कळणे जसे व्यवहारात जरूर असते, तद्वतच परमार्थातसुद्धा मी कोण हे कळले पाहिजे. ज्याला मी माझे म्हणतो तो मी नव्हे खास. माझा देह म्हटल्यावर मी त्याहून निराळाच नव्हे का ? देहाला ताप आला तर मला ताप आला, देह वाळला तर मी वाळलो, असे म्हणतो हीच चूक, हाच भ्रम. वास्तविक, देहाहून वेगळा असूनही देहच मी अशी भावना केली. म्हणून मी सुखदु:ख अनुभवू लागलो. दु:ख नको, सुख हवे, असे मला वाटते, याचा अर्थ माझे मूळचे स्वरूप हे नित्यसुख-रूपच असले पाहिजे.

नदीच्या पात्रातले पाणी आणि तिथूनच भांड्यात आणलेले पाणी, दोन्ही एकच; पण भांड्यातल्या पाण्याला चव किंवा स्वाद निराळाच येत असेल, तर भांड्यात घाण आहे असे आपल्याला समजते. तसे, सुख-रूप असणाऱ्या आत्म्याचाच अंश असलेला जीव दु:ख-रूप झाला याचे कारण देहसंगती. एका गृहस्थाची बायको बाळंत झाली, तेव्हा त्याच्या मित्राने डॉक्टरची मदत आणि अशा इतर अनेक बाबतीत धावपळ केली, पण त्याने सोयर मुळीच पाळले नाही; त्या मित्राप्रमाणे आपण देहाबाबत वागले पाहिजे.



### महाराज म्हणतात

एखादे झाड काढायचे असेल, आणि ते पुनः वाढू नये अशी इच्छा असली, तर त्याची पालवी वरवर खुडून काम होत नाही, त्याच्या मुळाला पाणी घालणे बंद केले पाहिजे. तद्वतच, संसाररूपी वृक्षाला आम्ही अभिमानाचे पाणी वारंवार घातल्यामुळे तो इतका फोफावला आहे, तो अभिमान नष्ट केला पाहिजे. मी कर्म केले हा भ्रम टाकून दिला पाहिजे. खरा कर्ता ईश्वर असताना जीव विनाकारणच मी कर्ता असे मानतो. कर्तृत्व आपल्याकडे घेतल्यामुळे जीव सुखदु:ख भोगतो. तेव्हा मी कर्ता नसून राम कर्ता ही भावना वाढविणे, हीच खरी उपासना होय. आपल्या आयुष्यात ज्या ज्या गोष्टी घडतात त्या सर्व भगवंताच्या इच्छेनेच घडतात अशी पूर्ण खात्री झाली की मग सुखदु:ख उरत नाही. ज्याची अशी खरी निष्ठा आहे त्याचे तेज काही निराळेच असते. अशा माणसाला अचल समाधान लाभते; किंबहुना, हेच साधुत्वाचे मुख्य लक्षण जाणावे. हे आपल्या अंगी यावे म्हणून साधनाची सर्व खटपट चालते.

खरोखर, तुम्हा सर्वांना आता पुन: एकच सांगतो की, सदैव नामात राहण्याचा प्रयत्न करा, आणि नीतीला धरून राहा; त्यानेच तुम्हांला भगवंत भेटेल. परमार्थात नीतीला, शुद्ध आचरणाला, फार महत्त्व आहे. जो शुद्ध मनाने परमेश्वराचे चिंतन, नामस्मरण करतो, त्याला साहाय्य करायला परमेश्वर सदैव तत्पर असतो. आपण त्या परमेश्वराला शरण जाऊन त्याच्या नामाचे प्रेम मागू या. दीनदयाळ भक्तवत्सल परमेश्वर कृपेचा वर्षाव करील याची खात्री बाळगा.

दैनिक ग्रामोद्धार हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक धनंजय रा. जाधव यांनी अजित ऑफसेट प्रिंटर्स १६८ अ रविवार पेठ, पोवई नाका, सातारा ४१५००२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक ग्रामोद्धार कार्यालय २२८ रविवार पेठ, पोवई नाका सातारा ४१५००२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संस्थापक, संपादक - स्व. रामचंद्र बा. उर्फ भाऊसाहेब जाधव, संपादक - धनंजय रा. उर्फ बापूसाहेब जाधव, कार्यकारी संपादक - अजितसिंह रा. जाधव, व्यवस्थापकीय संपादक चंद्रसेन जाधव. फोन नं. : (०२१६२)२३४२३२, २३८५१४, फॅक्स - २३८६६९. फलटण विभागीय कार्यालय : सागर अपार्टमेंट, डेक्कन चौक, लक्ष्मीनगर, फलटण. मोबा : ९९६०९१००२० Email-gramodharstr@gmail.com या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद- विवाद सातारा न्यायकक्षेत.

# वडूज बाजार समिती उर्जितावस्थेसाठी अनुकूल वातावरण

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**वडूज (अजित जगताप ):** ग्रामीण भागातील शेती उत्पन्न बाजार समिती म्हणजे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांची अर्थवाहिनी आहे. दुष्काळी खटाव तालुक्यामध्ये वडूज शेती उत्पन्न बाजार समिती उर्जितावस्थेत आणण्यासाठी आताच्या परिस्थितीमध्ये अनुकूल वातावरण तयार झालेले आहे. या संधीचा फायदा निश्चितच उचलला जाईल. असे चित्र दिसून येत आहे.



वडूज शेती उत्पन्न बाजार समितीची अवस्था व प्रवेशद्वार

वडूज शेती उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आरोप प्रत्यारोप झाले. पण, राजकीय नेत्यांनी राजकीय पक्ष ध्येयधोरण बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देण्याचे ठरवले आहे. त्यातूनच आता या बाजार समितीचे रुपडं बदलण्यास सुरुवात झालेली आहे.

पंचवार्षिक संचालक मंडळाच्या निवडीच्या वेळी खटाव तालुक्यातील ४२३० मतदारांपैकी २७९६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता . खटाव तालुका विकास आघाडीच्या माध्यमातून बाजार समितीमध्ये सत्ताधारी तेरा व इतर पाच संचालक कार्यरत आहेत. बाजार समितीचे गाळे व पेट्रोल पंपाचे काम युद्धपातळीवर सुरू झालेले आहे. ही आनंदाची बाब आहे.या शेती उत्पन्न बाजार समितीच्या समोरील सर्वच व्यापारी गाळ्यांची अवस्था बिकट झाली आहे . त्याचे पुनर्वसन व विकास कामांबाबत निश्चित ध्येय धोरण आखले जाणार आहे .

काही बाजार समितीमध्ये आले पीक खरेदी बाबत सरसकट आले दर ठरवल्यामुळे शेतकऱ्यांना चांगला दर मिळू लागलेला आहे. व्यापाऱ्यांनी सुद्धा त्याला साथ दिल्यामुळे आले पिकाची मागणी वाढू लागलेली आहे. परंतु काही ठिकाणी नोंदणीकृत ऐवजी इतर व्यापाऱ्यांकडून आले खरेदी- विक्री होताना दिसू लागलेले आहे. त्यामुळे खटाव तालुक्यातील शेतकरी वर्गाने सुद्धा अधिकृत व्यापाऱ्याकडेच आले देऊन योग्य दर घ्यावा. त्यामुळे काटेमारी होणार नाही. दुसऱ्या बाजूला शेती उत्पन्न बाजार समितीचे उत्पन्नही वाढेल. असे धोरण निदान सातारा जिल्ह्यात सुरू झालेले आहे . वडूज शेती उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ व नेतेगणमंडळी यांनी सुद्धा आले पिकाबाबत जनजागृती केली तर खटाव तालुक्यात बटाट्यानंतर आले पिकाला चांगला दर मिळणार आहे. शेतकऱ्यांना नगदी पीक देणाऱ्या उत्पन्न वाढवण्यासाठी संचालक मंडळाने कृषी विभागाच्या व जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या माध्यमातून जनजागृती म्हणून खटाव तालुक्यात दौरे आयोजित करावे. शेतकऱ्यांचे अडीअडचणी जाणून घ्याव्यात. असे सूर उमटू लागलेले आहेत. वडूज उत्पन्न बाजार समितीच्या पूर्वीच्या सभापती आण्णा वलेकर यांनी बाजार समितीच्या आवारात नवीन गाळे बांधण्यासाठी दिलेले योगदान हे खूप मोलाचे आहे. त्यामुळे बाजार समितीचे उत्पन्न वाढणार आहे. विकास करायचा असेल तर नवीन निर्मिती करणे गरजेचे आहे. सर्व नेतेगण मंडळी त्यासाठी एका दिल्याने प्रयत्नशील आहेत. ही चांगली गोष्ट आहे. स्वतः माजी आमदार प्रभाकर घार्गे यांच्या दूरदृष्टीपणामुळे लवकरच शेती उत्पन्न बाजार समिती नावलौकिक प्राप्त करेल. असे दिसून येत आहे. उच्चशिक्षित संचालक असलेल्या सौ सुनीता मगर, सौ लता जगदाळे यांच्या माध्यमातून महिला शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ मिळावा. असे खटाव तालुक्यातील महिला बचत गटाच्या माध्यमातून उद्योग उभारणीलाही बाजार समितीने सहकार्य केले तर खऱ्या अर्थाने लाडकी बहीण योजनाही राबवल्याचे भाग्य लाभणार आहे.

वास्तविक पाहता आपल्या नावासमोर सभापती पद लागावे एवढ्या पुरत मर्यादित हे पद नसून कर्तव्याचा ही विसर पडू नये. वडूज शेती उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती आण्णा वलेकर यांनी शेती उत्पन्न बाजार समितीच्या गाळ्यांबाबत सकारात्मक पाऊल उचलले आहे. तशा पद्धतीने समितीच्या विकासासाठी सर्वांनीच हातभार लावण्याची अपेक्षा शेतकऱ्यांची आहे.

# नगरपालिकेसाठी केंद्राकडून योजना आणण्याकरिता आग्रही राहणार : खा.धैर्यशील मोहिते-पाटील


आढावा बैठक प्रसंगी खा. धैर्यशील मोहिते – पाटील,राष्ट्रवादी चे नेते प्रभाकर देशमुख,माजी नगराध्यक्ष विलासराव माने, राष्ट्रवादी कॉ जिल्हा उपाध्यक्ष किशोर सोनवणे आदी (छाया: विजय भागवत)

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**म्हसवड** : म्हसवडच्या पाणी प्रश्न व इतर कामाच्या अडी अडचणी संदर्भात खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांची आढावा बैठक म्हसवड नगरपालिका सभागृहात पर पडली यावेळी खासदार धैर्यशील मोहिते पाटील,राष्ट्रवादी चे नेते प्रभाकर देशमुख,माजी नगराध्यक्ष विलासराव माने, राष्ट्रवादी कॉ जिल्हा उपाध्यक्ष किशोर सोनवणे, परेश व्होरा जय राजेमाने पृथ्वीराज राजेमाने, रा. कॉ.चे विश्वंभर बाबर, फ्युचर फास्ट अकॅडमीचे फाऊंडर अभय वाघमारे,सचिन लोखंडे, मुख्याधिकारी सचिन माने आदी मान्यवर उपस्थितीत होते

यावेळी बोलताना खा.मोहिते पाटील म्हणाले राजकारण फक्त निवडणुकी पुरते असते निवडणुका संपल्याकी राजकारण विरहित काम करणे आपले कर्तव्य आहे या ठिकाणी प्रत्येकाच्या समस्या सोडवणे माझे काम आहे नगरपालिकेसाठी केंद्राकडून मिळणाऱ्या ज्या योजना असतील त्या मिळवण्यासाठी मी आग्रही राहणार आहे त्याचप्रमाणे माणगंगा नदीत जिहे कंटापूर अथवा उरमोडीचे पाणी सोडण्याबाबत मागील महिन्यात पालकमंत्र्याकडे मागणी केली असून लवकरच ते पाणी माण नदीपात्रात येईल त्यामुळे म्हसवड कराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवता येईल असे सांगितले

या आढावा बैठकीत खा. मोहिते पाटील यांनी नवीन पाणी पुरवठा योजनेच्या कामाचा आढावा घेऊन ते लवकर पूर्ण करण्यासाठी साठी प्रयत्न करण्या बाबत तसेच सध्या जुनी पाणी पुरवठा योजनेतून तीन चार दिवसातून पाणी पुरवठा कसा करता येईल या विषयी माहिती घेतली

यावेळी अनेक नागरिकांनी आपल्या समस्या खा.धैर्यशील मोहिते पाटील यांच्यापुढे मांडल्या त्यामध्ये पंधरा दिवसातून येणारे पिण्याचे पाणी, दूषित पाणीपुरवठा, बंद पडलेल्या स्ट्रीटलाईट, चांदणी चौक ते शिक्षक कॉलनी रस्ता दुरुस्ती, वाहतूक कोंडी,या समस्यांचे नीराकरण करण्यासाठी मुख्याधिकारी डॉ. सचिन माने यांना खा. धैर्यशील मोहिते – पाटील यांनी सूचना दिल्या.

# मराठा उद्योजक निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील : ना. नरेंद्र पाटील

## कराड येथे सत्कार व अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचा मेळावा

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कराड :** नव्याने व्यवसाय करणाऱ्या मराठा समाजाच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे. त्यांना पाठबळ दिले पाहिजे या उद्देशाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून कर्ज पुरवठा केला जातो. व्यवसाय करण्यासाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड वेळेवर करणे गरजेचे आहे. व्यवसाय सुरू करण्यापूर्वी त्याचे प्रशिक्षण घेऊन ज्ञान घेतले पाहिजे. आजपर्यंत महामंडळाच्या माध्यमातून कर्ज घेऊन यशस्वी झालेल्या उद्योजकांच्या यशामध्ये बँकांचा मोलाचा वाटा आहे. भविष्यातही मराठा समाजाचे जास्तीत जास्त उद्योजक निर्माण करण्यासाठी महामंडळाच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याची ग्वाही अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष ना. नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी दिली.



अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या माध्यमातून एक लाख मराठा उद्योजकांना आर्थिक पाठबळ दिल्याबद्दल आयोजित सत्कार व उद्योजकांच्या मेळाव्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कराड अर्बन बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष एरम होते. यावेळी अर्बन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सीए दिलीप गुरव, वसंतराव चव्हाण, राजेश पवार, नामदेव थोरात, रोहित पाटील, भगवानराव जाधव, विजय मुठेकर आदी उपस्थित होते.

ना. नरेंद्र पाटील म्हणाले, मला सत्काराची हौस नाही. शून्यापासून सुरुवात करून ज्यांनी उद्योग मोठे केले आहेत. त्यांचाही सत्कार झाला पाहिजे. खडतर परिस्थितीतून वाटचाल करत उद्योग व्यवसाय मोठे करणारे लोक इतरांसाठी प्रेरणादायी असतात. ज्या ठिकाणी संघर्ष आहे, तेथे आम्ही उभा असतो. संघर्षाच्या माध्यमातून काही लोकांचे हित साध्य होत असेल, काही लोकांची प्रगती होत असेल किंवा काहींना न्याय मिळत असेल तर तो संघर्ष आम्हाला फार आवडतो. सामान्य परिवारातून जो महामंडळाच्या योजनांचा लाभ घेतो, अशा लोकांना जास्तीत जास्त प्राधान्य दिले पाहिजे. शून्यापासून व्यवसायास सुरुवात करून त्यामध्ये यश मिळाले असेल तर तो आनंद खरा व मोठा असतो. त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडली पाहिजे. नव्याने व्यवसाय करणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे, त्यांना पाठबळ दिले पाहिजे, हा आमचा मुख्य हेतू आहे. एखाद्याने कर्ज घेतल्यानंतर त्याची परतफेड वेळेवर करावी. महामंडळाच्या माध्यमातून एक लाख लोकांनी व्यवसाय करून इतरांना रोजगार निर्मिती करून दिली आहे. त्याच पद्धतीने यापुढेही मराठा युवकांनी पुढे येऊन व्यवसायाच्या माध्यमातून स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. बँकांचे घेतलेले कर्ज थकीत न ठेवता त्याची वेळेवर परतफेड केली पाहिजे. मराठा समाज बँकांची कर्जे वेळेवर फेडतो असा मेसेज देशभर गेला पाहिजे. महामंडळाच्या माध्यमातून को-ऑपरेटिव्ह बँकांना ताकद मिळेल, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. सुभाष एरम म्हणाले, शताब्दी हॉल निर्माण करण्याचा उद्देश आज खऱ्या अर्थाने सफल झाला आहे. महामंडळाच्या माध्यमातून आणखी उद्योजक निर्माण होतील. मराठी उद्योगांच्या यशामध्ये सरकारी व सहकारी बँकांचे योगदान आहे. महामंडळाच्या माध्यमातून मराठा समाजाला आर्थिक शिस्त लागेल. कराड अर्बन बँकेने राज्याभर उद्योजक उभे केले. सहकारी बँका सर्वसामान्य लोकांच्या पाठीशी आहेत.

यावेळी सीए दिलीप गुरव, रोहित पाटील, भगवानराव जाधव, वसंतराव चव्हाण, राजेश पवार, रोहिणी पाटील यांच्यासह अनेकांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक उदय थोरात यांनी केले. सुत्रसंचलन करून मानपत्राचे वाचन विकास पाटील यांनी केले. आभार हणमंतराव पाटील यांनी मांडले.

# विज्ञानदृष्टी देवून चिकित्सक नागरीक घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम म.अंनिस करते : प्राचार्या छाया कदम

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** सद्यस्थितीत विद्यार्थ्यांना विज्ञानदृष्टी देवून चिकित्सक नागरीक घडविण्याचे महत्त्वपूर्ण काम महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती करीत आहे. असे प्रतिपादन प्राचार्या सौ.छाया कदम यांनी केले.

येथील सुशिलादेवी साळुंखे ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्समध्ये आयोजीत केलेल्या कार्यक्रमात प्राचार्या छाया कदम अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करीत होत्या.


मनोरंजनातून विज्ञान सादर करताना प्रशांत पोतदार शेजारी प्राचार्या कदम,ऍड. धुमाळ व विद्यार्थिनी.(छाया-अनिल वीर)

म.अंनिसचे मनोरंजनातून विज्ञान या कार्यक्रमात राज्य कार्यकारिणी सदस्य प्रशांत पोतदार यांनी, माझ्या भारत देशात, कोणी कितीही शिकला, साधं विज्ञान विसरला ! हे गीत घेवून प्रारंभ केला.प्राचार्या कदम यांच्या हस्ते पाण्याचा दिवा प्रज्वलित करून औपचारिक उद्घाटन केले. जादुटोणा विरोधी कायदा व पीपीटीद्वारे शहिद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृती जागविणा-या आठवणीसह सादर करून विद्यार्थी - विद्यार्थीनीना अंतर्मुख केले. अंगात येणे पाठीमागची कारण मिमांसा विषद करून अॅड. हौसेराव धुमाळ यांनी हातावरून जळता पलीता फिरवून प्रेक्षकांना आचंबीत केले.विद्यार्थीनीनीही अनुभूती घेतली. जिभेतून त्रिशूल आरपार करून दाखवतानाचे चमत्कारी थ्रीलही सादर करण्यात आले.

याकामी, जूनियर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. मृणाल गायकवाड , प्रा. श्रीमती पुनम गुरसाळे, लोहार सर, प्रा. पवार, प्रा. विभुते सर, प्रा. मुल्ला, प्रा. कुलकर्णी, प्रा. देशमुख, प्रा. माने सर, प्रा. शेखताई व प्रा. राजेताई यांनी विशेष असे परिश्रम घेतले. प्रास्ताविक प्रा. मिथून माने केले तर आभार प्रदर्शन प्रा. पुनम गुरसाळे यांनी मानले.

**महाराष्ट्र शासन**
**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे**
**अधीक्षक अभियंता सातारा सिंचन मंडळ, सातारा**
**कृष्णा सिंचन विभाग, सातारा**
**द्वितीय देकार ई-निविदा सूचना क्र. ०७ सन २०२३-२४**
**Main portal: http://mahatenders.gov.in**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कृष्णा सिंचन विभाग, सातारा जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामाकरीता, ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येवून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच सविस्तर निविदा सूचना व ई निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कृष्णा सिंचन विभाग, सातारा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदासुचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळवर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची अंदाजित किंमत (लक्ष) |
|---|---|---|
| १ | ठोसेघर लघु प्रकल्पाच्या कालवा प्रणालीचे बंदिस्त प्रणालीमध्ये (PDN) रूपांतर करणेच्या कामाचे सर्वेक्षण करून संकल्पन व अंदाजपत्रक तयार करणे. | ८,५३,८८८/- |

| | |
|---|---|
| **ई निविदा उपलब्ध कालावधी** | दिनांक ०५/०८/२०२४ ते दिनांक: १४/०८/२०२४. स. १६.०० वाजेपर्यंत |
| **ई-निविदा उघडणे** | दिनांक १६/०८/२०२४, ११.०० वाजता. |

खालील संकेत स्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. **http://wrd.maharastra.gov.in**
२. **http://mahatenders.gov.in**
(सदर निविदा सूचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, कृष्णा सिंचन विभाग, सातारा यांचे कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र.कृसिंवि/निविदा/२५४९/२०२४**
**कृष्णा सिंचन विभाग, सातारा**
**दिनांक : २५/०८/२०२४**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**कृष्णा सिंचन विभाग, सातारा**
**(दुरध्वनी क्रं.०२१६२-२४४६८१ Email:eekidstr@gmail.com)**

**(जिमाका/सातारा/जा/७६/२०२४-२०२५)**

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, सातारा**
**बांधकाम भवन, सदरबझार, सातारा ४१५ ००१**

ई-मेल पत्ता- westsatara.ee@mahapwd.gov.in दूरध्वनी/फॅक्स क्रमांक : (o2162) - 234239

**अल्पकालावधीची ई-निविदा सूचना क्र. २९ सन २०२४-२५ (ऑनलाईन)**

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग सातारा ४१५ ००१ (दूरध्वनी क्रमांक ०२१६२-२३४३२९)** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून या विभागाच्या कार्यकक्षेतील खालील कामांकरीता **ब-१** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. **कामाच्या अंदाजपत्रकीय दरामध्ये जीएसटी समाविष्ठ नाही. कंत्राटदार यांनी त्यांचा देकार सुध्दा जीएसटी वगळून (समाविष्ठ न करता) द्यावयाचा आहे. कंत्राटदार यांना जीएसटी देयकाच्या रकमेवर देय दराने स्वतंत्रपणे अदा करण्यात येईल.**

| ई-निविदा काम क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | मौजे गोरेवाडी मुरूड ता.पाटण मराठी शाळेजवळ साकव बांधणे ता.पाटण जि. सातारा | ४५.४५ |
| २ | मौजे यशवंतनगर बालाजीनगर येथे साकव बांधणे ता.वाई जि. सातारा | ४५.३८ |
| ३ | मौजे वनकुसवडे ता.पाटण बावीच्या ओढयावर साकव बांधणे ता.पाटण जि. सातारा | ४८.२९ |
| ४ | शेंडेवाडी राम मंदिर ते स्मशानभूमी रस्त्यावर साकव बांधणे ता.पाटण जि. सातारा | ३८.७९ |
| ५ | मौजे लुगडेवाडी येरफळे ता.पाटण येथे झऱ्याजवळ साकव बांधणे ता.पाटण जि. सातारा | ३६.६७ |

**निविदा उपलब्ध कालावधी** :- दि. ०५/०८/२०२४ ते दि. १२/०८/२०२४
**निविदापुर्व बैठक** :- लागु नाही
**ई-निविदा उघडणे** :- दि. १३/०८/२०२४ ते दि. १४/०८/२०२४

खालील संकेत स्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. https : mahapwd.gov.in
२. https:mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सा.बां.(पश्चिम) विभाग, सातारा कार्यालयातील सूचना फलक.
४. सदर निविदा ह्या सक्षम प्राधिकारी यांचे मंजूरीच्या अत्रावर काढलेल्या आहेत. सदर कामातील एक किंवा सर्व कामांच्या ई-निविदा स्विकारणेअथवा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरी कारांनी राखुन ठेवलेले आहेत.

**जा.क्र.लेखा/निविदा/८७७६/२०२४**
**कार्यकारी अभियंता, सा. बा.(पश्चिम) विभाग,**
**सातारा यांचे कार्यालय**
**दिनांक : २५/०७/२०२४**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सा. बां.(पश्चिम) विभाग, सातारा**

**(जिमाका/सातारा/जा/७१/२०२४-२०२५)**



मयताच्या वारसांना मदतीचा धनादेश देताना आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले. शेजारी मान्यवर...

# ताकवली येथील मयताच्या कुटुंबियांना मिळाली ४ लाखांची मदत

## आ. शिवेंद्रसिंहराजेंचा पाठपुरावा; कृष्णा वायकर यांचा बुडून झाला होता मृत्यू

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** ताकवली येथील कृष्णा गणपत वायकर, वय ५० हे बेपत्ता झाले होते. सांडवली धबधब्याच्या पाण्यातून वाहून गेल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाल्याचे पोलिसांच्या तपासाअंती निष्पन्न झाले होते. वायकर यांच्या कुटुंबियांना शासनाकडून आर्थिक मदत मिळावी यासाठी आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पाठपुरावा केला आणि वायकर यांच्या कुटुंबियांना ४ लाख रुपये नैसर्गिक आपत्ती सानुग्रह अनुदान मिळवून दिले.

दि. २७ जुलै २०२४ रोजी कृष्णा वायकर हे बेपत्ता झाले होते. सांडवली धबधब्याचे पाणी ताकवली येथील ओढ्यात आले आणि ओढ्याच्या पाण्यातून वाहून गेल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाल्याचे समोर आले होते. मृत वायकर यांच्या गरीब कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत मिळावी यासाठी आ. शिवेंद्रसिंहराजेंनी पाठपुरावा सुरु केला आणि वायकर कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत मिळवून दिली. मदतीचा धनादेश आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या हस्ते आज मृत वायकर यांच्या वारसांकडे सुपूर्त करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजू भोसले, शशिकांत झगडे, तहसीलदार नागेश गायकवाड, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक सुरेश सावंत, भिकू भोसले, श्रीरंग देवरुखे, बाळासाहेब घोरपडे, शांताराम लोटेकर, अंकुश मोरे आदी उपस्थित होते. आर्थिक मदत मिळवून दिल्याबद्दल वायकर कुटुंबीयांनी आ. शिवेंद्रसिंहराजेंचे आभार मानले.

# सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले यांची सोमवारी ११ वी पुण्यतिथी



**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**कराड :** कृष्णाकाठच्या सहकार, आरोग्य आणि शैक्षणिक विकासाचे प्रणेते सहकारमहर्षी स्व. जयवंतराव भोसले (आप्पासाहेब) यांची सोमवार दि. ५ ऑगस्ट रोजी ११ वी पुण्यतिथी आहे. यानिमित्त सकाळी ८.३० वाजता कृष्णा हॉस्पिटलच्या प्रांगणातील स्व. आप्पांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पार्पण व अभिवादन केले जाणार आहे.

स्व. जयवंतराव भोसले यांनी सहकार, शिक्षण आणि आरोग्य यांना केंद्रबिंदू मानून कृष्णाकाठी विकासाचे नवे पर्व सुरू केले. कृष्णा कारखान्याच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणली. तसेच कृष्णा परिवारातील अनेकविध संस्थांच्या माध्यमातून आज लाखो विद्यार्थी शिक्षण घेऊन यशस्वी कारकीर्द घडवित आहेत. कृष्णा रूग्णालयाच्या माध्यमातून कराडसह संपूर्ण सातारा जिल्हा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी जिल्ह्याच्या परिसरातील रूग्णांना अद्ययावत अशा स्वरूपाच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध होत आहेत.

त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी सोमवारी (ता. ५) कराडसह वाळवा तालुक्यात ठिकठिकाणी त्यांच्या प्रतिमेचे पूजन होईल. तसेच स्थानिक पातळीवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# शेडचे नुकसान व जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध तक्रार

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**औंध :** औंध येथील एकाच्या शेडचे नुकसान व जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी तीन जणांविरुद्ध औंध पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल झाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, गुरुवार दि. १ ऑगस्ट रोजी सायंकाळी पाचचे दरम्यान तक्रारदार सुशील रणदिवे त्यांची आई विद्या रमेश रणदिवे, कामगार इंदु बुटे, उषा अरुण पवार, वनिता भोसले, ज्योती कुंभार, मनिषा भोसले हे औंध येथील कुदळा नावाचे शिवारात ड्रॅगनफ्रुटची फळे तोडत होते.त्यावेळी तेथे बाजुलाच शेती असलेले विनोद हरीबा गायकवाड, कुणाल संभाजी गायकवाड, सुनिता विनोद गायकवाड हे त्यांचे शेतात होते. त्यावेळी सुनिता विनोद गायकवाड ही आम्हाला



जातीवाचक शब्द वापरून आमचे शेताजवळून जायचे नाही, विनोद गायकवाड हा आम्हाला जातीवाचक भाषा वापरून मस्ती आली आहे, कुणाल गायकवाड यानेही ही अशीच भाषा वापरून येथे शेतीच कशी करतात हे मी बघतो अशी जातीवाचक शिवीगाळ व धमकी दिली असे तक्रारीत सुशील रमेश रणदिवे यांनी म्हटले आहे.

त्यानंतर शुक्रवारी सकाळी शेतातील मेटाकुटीच्या शेडला विनोद हरिबा गायकवाड,कुणाल संभाजी गायकवाड यांनी आपसात संगणमत करून आग लावून शेडमधील इलेक्ट्रॉनिक दोन वजन काटे, आठ कॅरेट, औषध फवारणीचे दोन पंप, पाईप, तळवट, जार, २५ हजार रुपये किंमतीची आठ खतांची पोती, गॅस शेगडी,धान्याची पोती, फळांची पॅकिंग मशीन व अन्य साहित्य असे सुमारे ६५ हजार रुपयांचे नुकसान केले असल्याचे रणदिवे यांनी तक्रारीत म्हटले आहे.

याप्रकरणी वरील तिघांविरुद्ध औंध पोलीस स्टेशनमध्ये पोलीस नाईक आर.एस.सरतापे यांनी गुन्हा दाखल केला आहे.अधिक तपास उपविभागीय पोलिस अधिकारी अश्विनी शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि चिमणाजी केंद्रे करीत आहेत.

# गोरेगाव येथे आज बेलनाथ महाराजांचे कीर्तन

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**वडूज :** गोरेगाव वांगी (ता. खटाव) येथे सोमवार दि. ५ रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत भिमाशंकर येथिल ह.भ.प.बेलनाथ महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन होणार असल्याची माहिती वेताळ भक्त दादा महाराज पुजारी यांनी दिली.

वेताळ देवस्थानचे गुरूवर्य काशिनाथ गुरव तथा पुजारी बापू यांच्या स्मरणार्थ या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. याशिवाय विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रम तसेच भजन, अध्यात्म क्षेत्रातील हीतचींतकांचा स्नेह मेळावा व महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. कार्यक्रमास ग्रामस्थ व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.




# युगपुरुषांचा विचारवारसा जपूयात : प्राचार्य अरुण गाडे

## आंबेडकरांच्या भेटीस शाहू बोर्डिंगमध्ये उजाळा

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**सातारा :** शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे ओळखूनच कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शाळा - महाविद्यालये सुरू केली. त्यामुळे महाराष्ट्राच्या कैक पिढ्या घडल्या. जर शाळा - महाविद्यालये काढली नसते तर महाराष्ट्राचे नुकसान झाले असते. बहुजनांच्या शिक्षणासाठीची कर्मवीर अण्णांची धडपड डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिली - अनुभवली, म्हणूनच डॉ. आंबेडकर आणि भाऊराव पाटील यांच्यातला जिव्हाळा, वैचारिक स्नेह अधिक घट्ट झाला. या दोन्ही युगपुरुषांचा विचारवारसा आपण जपला पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अरुण गाडे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धनिणीच्या बागेतील शाहू बोर्डिंगला भेट दिली. त्या भेटीचा ९६ वा वर्धापन दिन साताऱ्यातील विविध परिवर्तन संस्था संघटना यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यामध्ये अध्यक्षस्थानाहून प्राचार्य अरुण गाडे बोलत होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिनाचे तथा विद्यार्थी दिवसाचे प्रवर्तक अरुण जावळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष चंद्रकांत खंडाईत वसतिगृहाचे प्रमुख प्रशांत गुजरे, हरिदास जाधव आदीची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य अरुण गाडे पुढे म्हणाले, कर्मवीर अण्णांनी हे शाहू बोर्डिंग सुरू केल्यानंतर जेव्हा या बोर्डिंगला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भेट दिली त्यावेळी सर्व जातीधर्माची मुले इथे एकत्र राहतात, एकत्र जेवतात हे पाहून त्यांना आनंद झाला. डॉ. आंबेडकरांनी या बोर्डिंगमध्ये विद्यार्थ्यांसोबत ज्वारीची भाकरी आणि लसणाची चटणी खाल्ली. शिवाय २० रुपये देणगीही दिली. शाहू बोर्डिंग भाऊरावांच्या आणि डॉ. आंबेडकरांच्या भेटीची साक्ष आणि प्रेरणा देणारी ऐतिहासिक वास्तू ठरली आहे. या वास्तूतून नव्या पिढ्या कायम घडत रहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

शाळा प्रवेश दिनाचे तथा विद्यार्थी दिवसाचे प्रवर्तक अरुण जावळे यांनी आपल्या भाषणात भाऊराव पाटील आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील ऋणानुबंध उलगडून दाखवला. शाहू बोर्डिंगला डॉ. आंबेडकरांनी दिलेली भेट आणि शिका संघटित व्हा अन् संघर्ष करा हा दिलेला मूलमंत्र यासंबंधाने विश्लेषण केले. ७५ वय असणारे या बोर्डिगचे विद्यार्थी हरिदास जाधव यांचेही भावस्पर्शी मनोगत झाले.

याच बोर्डिंगमध्ये मी शिकलो आणि घडलो. पुढे शिक्षक आणि मुख्याध्यापक झालो. त्यामुळे आज या बोर्डिंगमध्ये उभे राहताना अभिमानाने ऊर भरून येत असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली. दरम्यान चंद्रकांत खंडाईत, सुधाकर शिलवंत, बी. एल. माने, मच्छिंद्र जाधव यांचीही भाषणे झाले. प्रारंभी डॉ. शाहीर श्रीरंग रणदिवे यांच्या पोवाड्याने सुरूवात झाली.

प्रास्तविक प्रशांत गुजरे यांनी केले तर नारायण जावलीकर यांनी आभार मानले. या दरम्यान विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

# मराठा शेतकरी बांधवांची गुरवारी पाटण येथे ट्रॅक्टर रॅली

**ग्रामोध्दार वृत्तसेवा**

**पाटण-** मराठा आरक्षण जनजागृतीसाठी सातारा येथे शनिवार दि.-१० ऑगस्ट रोजी मराठा योध्दा मनोज जरांगे-पाटील यांची शांतता रॅली आयोजित करण्यात आली आहे. या शांतता रॅलीच्या प्राश्वभूमिवर पाटण येथे गुरवार दि.- ८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मराठा शेतकरी बांधवांनी ट्रॅक्टर रॅलीचे आयोजन करुन शासनाकडे हक्काच्या मराठा आरक्षण मागणी साठी प्रांताधिकारी व तहसिलदार यांना निवेदन देण्यात येणार असल्याचे पाटण तालुका सकल मराठा समाजाकडून सांगण्यात आले.



मराठा संघर्ष यौद्धा मनोज जरांगे पाटील शनिवार दि १० ऑगस्ट रोजी सातारा येथे मराठा आरक्षण जनजागृती व शांतता रॅली साठी येत आहेत. या रॅलीची जनजागृती करण्यासाठी तसेच जातीचे व कुणबी दाखले देताना प्रांत, तहसील कार्यालयाकडून तसेच दलालांकडून होत असलेल्या अन्यायाच्या विरोधात गुरुवार दि. ८/८/२०२४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता पाटण प्रांत व तहसिल कार्यालयावर ट्रॅक्टर रॅली काढून निवेदन देण्यात येणार आहे. हि रॅली गुरवारी रोजी सकाळी १० वाजता मारुती मंदिर रामापुर येथून सुरू होऊन नवीन एसटी स्टँड, झेंडा चौक, लायब्ररी चौक, मोरे गल्ली मार्गे तहसिल कार्यालय येथून सिध्दार्थ नगर, प्रांत कार्यालय पाटण येथे निवेदन देऊन पुन्हा लायब्ररी चौक मार्गे नवीन एसटी स्टँड येथे या रॅलीचा सांगता समारंभ होणार आहे. या रॅलीत बहुसंख्य मराठा बांधवांनी व ट्रॅक्टर शेतकरी बांधवांनी आपल्या ट्रॅक्टरासह सहभागी होऊन मुलाबाळांच्या भवितव्यासाठी मराठ्यांचे ऐक्य दाखवावे. असे आवाहन सकल मराठा समाज पाटण तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# पुण्यात भीषण अपघातात २ ठार; नाशिकमध्येही बस-कारची धडक, २ महिलांचा मृत्यू

पुणे : अपघाताच्या घटनांमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने वाढ होताना दिसून येत आहे. कधी रस्ते अपघात , तर कधी रेल्वे अपघाताच्या घटना घडत असून रस्त्यांवरील खड्डे तसेच, ओव्हरस्पीड गाड्या हे रस्ते अपघाताचे मुख्यत्वे कारण असल्याचं दिसून येतं. आता, नाशिक आणि पुणे जिल्ह्यात अपघाताच्या दोन घटना घडल्या आहेत. या भीषण अपघातात ४ जणांना मृत्यू झाला आहे. पुण्यात नगर कल्याण महामार्गावरील पिंपळगाव जोगा येथे लक्झरी आणि चारचाकी वाहनाचा भीषण अपघात झाला. तर, नाशिकच्या दिंडोरी रस्त्यावरील आकराळे फाट्याजवळही बस आणि कारचा भीषण अपघात झाला असून या अपघातानंतर दोन्ही गाड्यांनी पेट घेतला होता. राज्यात एकीकडे पावसाने जनजीवन विस्कळीत झालं असताना, दुसरीकडे पुणे व नाशिकमध्ये भीषण अपघाताच्या दोन घटना घडल्या आहेत. दोन विविध ठिकाणच्या या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. नाशिक जिल्ह्याच्या दिंडोरी रस्त्यावरील आकराळे फाट्याजवळ बस आणि कारमध्ये भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातानंतर दोन्हीही गाड्यांनी अचानक पेट घेतल्यामुळे सगळ्यांची दमछाक झाली होती. बसने पेट घेतल्यानंतर अग्निशमन दलाच्या कारला पाचारण करण्यात आले,

# पान १ वरुन

## २० तारखेला मविआची बैठक

निवडणुकीत विजयाचा दावा करताना दिसत आहेत. मात्र, महायुतीही राज्यात पुन्हा सरकार स्थापन करण्याचा दावा करत आहे.

## पिता-पुत्र पवारांच्या भेटीला...

पुत्र रणजिसिंह शिंदे शरद पवार यांना भेटण्यासाठी आल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे. या भेटीमुळं अजित पवार गटाला मोठा धक्का मानला जातोय. कारण आमदार बबनराव शिंदे शरद पवार गटात घरवापसी करणार का? असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आमदार बबनराव शिंदे यांचे पुत्र रणजितसिंह शिंदे हे माढा विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे. तर त्यांच्या विरोधात त्यांचे चुलत बंधू धनराज शिंदे निवडणूक लढण्याच्या तयारीत आहेत. आमदार बबनदादा शिंदे यांचे बंधू रमेश शिंदे यांनी काही दिवसापूर्वी खासदार सुप्रिया सुळेंची भेट घेतली होती. तर आमदार बबदादा शिंदे यांचे पुतणे धनराज शिंदे यांनी रोहित पवार यांचे वडिल राजेद्र पवार यांची भेट घेतली होती. त्यामुळं राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरु होती. दरम्यान, येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांची तुतारी कोणाला मिळणार? याची सर्वत्र चर्चा सुरु आहे.

माढ्यातून विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी अनेकजण इच्छुक

विधानसभा मिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. माढ्यातून विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी अनेकजण इच्छुक आहेत. आमदार बबनदादा शिंदे यांनी अजित पवार गटाला पाठिंबा दिल्यानंतर शरद पवार गटाकडून धनराज शिंदे, संजय पाटील घाटणेकर, संजय कोकाटे हे इच्छुक आहेत. तसेच अभिजित पाटील यांच्यासह मिनल साठे यांच्या नावाची देखील चर्चा सुरु आहे. मात्र, अशातच आता बबनदादा शिंदे यांनी शरद पवार यांची भेट घेतल्यानं पुढे नेमकं काय होणार हा येणारा काळच ठरवेण.

## युवतीला वाचविण्यात यश...

ठाण्याचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले . खोल दरीमध्ये दोरखंड टाकून युवतीला सुखरूपपणे बाहेर काढले. दरम्यान पर्यटकांनी धोकादायक ठिकाणी जाऊन आपला जीव धोक्यात घालू नये असे आवाहन सातारा तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश तांबे यांनी केले आहे. या दुर्घेटनेत नसरीन गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने साताऱ्यातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं. अतिदक्षता विभागामध्ये तिच्यावर उपचार सुरू आहेत.

पर्यटनाचा आनंद घेताना काळजी घ्या

दरम्यान, नुकताच सोशल इन्फ्लुएंसर आन्वी कामदार हिचा सेल्फीच्या नादात दरीत पडून मृत्यू झाला होता. पावसाळ्यात धबधब्यांवर जाण्याकडे पर्यटकांचा कौल असतो. पण अशा ठिकाणी जाताना सुरक्षित अंतरावरुन निसर्गाचा आनंद घेणं गरजेचय. पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह कधीही वाढू शकतो. निसरड्या रस्त्यावरुन तुम्ही घसरु शकता. त्यामुळे अशा ठिकाणी जाताना विशेष काळजी घेण गरजेचं आहे. कारण, थोडीशी चूक तुमच्या जीवावर बेतू शकते. आपला निसर्ग पर्यटनाचा आनंद आपल्या स्वकीयांच्या दु:खाचे कारण ठरता कामा नये.

## बांगला देशात हिंसक आंदोलन

टेक्निकल, मीरपूर-१०, रामपुरा, तेजगाव, फार्मगेट, पंथपथ, जत्राबारी आणि उत्तरा येथेही निदर्शने आणि रॅली काढण्यात येणार असल्याचे निदर्शनाच्या आयोजकांनी सांगितले. सरकारी नोकऱ्यांसाठी असलेली कोटा पद्धत रद्द करण्याच्या मागणीसाठी बांगलादेशातील विद्यार्थी एका महिन्याहून अधिक काळ आंदोलन केले होते. विद्यार्थ्यांच्या या आंदोलनामुळे देशभरात हिंसा भडकली, त्यात कमीत कमी २०० लोकांचा मृत्यू झाला आहे.

आंदोलकांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये प्रमुख विरोधी बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीने पाठिंबा दिलेल्या काही गटांचा समावेश आहे. आंदोलकांनी कर आणि बिले न भरण्याचे आणि रविवारी कामावर न जाण्याचे आवाहनही केलं. आंदोलकांनी रविवारी ढाक्याच्या शाहबाग भागातील बंगबंधू शेख मुजीब मेडिकल युनिव्हर्सिटी या रुग्णालयासह खुल्या कार्यालयांवर आणि आस्थापनांवरही हल्ले केले. ढाका येथील उत्तरा भागात काही क्रूड बॉम्बचा स्फोट झाला आणि बंदुकीच्या गोळ्या ऐकू आल्या असं प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. रविवारी लाठ्या-काठ्या घेऊन आंदोलकांचा जमाव ढाका शहराच्या मध्यभागी शाहबाग चौकात जमला तेव्हा पोलिस आणि आंदोलकांमध्ये जोरदार संघर्ष झाला. याशिवाय अनेक ठिकाणी आणि प्रमुख शहरांमध्ये रस्त्यावर आंदोलक आणि पोलिस कर्मचारी यांच्यात बाचाबाची झाली. आंदोलकांनी प्रमुख महामार्ग रोखून धरले होते.

# अतिवृष्टीमुळे सांगलीतील ११६ गावे बाधित, साडेआठ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान



**सांगली :** अतिवृष्टी व सततचा पाऊस यामुळे जिल्ह्यातील ११६ गावे बाधित झाली असून, साडेआठ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिली. जिल्ह्यात आतापर्यंत ५ हजार १४५ नागरिकांचे स्थलांतर झाले असल्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात शिराळा वगळता अन्य ठिकाणी शनिवारी पावसाने विश्रांती घेतली असली, तरी विविध धरणांतून करण्यात येत असलेल्या विसर्गामुळे येत्या २४ तासांत कृष्णेच्या पाणी पातळीमध्ये एक ते दोन फुटांनी वाढ अपेक्षित असून, नदीकाठी सतर्क राहण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

शुक्रवारी रात्रीपासून आयर्विन पुलाजवळ कृष्णा नदीची पाणीपातळी ३९ फूट १० इंचावर स्थिर आहे. तथापि, सातारा जिल्ह्यात दोन दिवस अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. कोयनेतून ५२ हजार १०० आणि चांदोली धरणातून ११ हजार ५३९ क्युसेक विसर्ग सुरू आहे. पडणारा पाऊस, धरणातून होत असलेला विसर्ग यामुळे नदीच्या पाणी पातळीत वाढ गृहीत धरून नदीकाठच्या रहिवाशांनी सतर्क राहावे, असा इशारा जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिला आहे.

जिल्हाधिकारी म्हणाले, की अतिवृष्टी व सततचा पाऊस यामुळे ११६ गावांतील ८ हजार ५५६ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचा आदेश दिला आहे. राज्य मार्ग ५, प्रमुख जिल्हा मार्ग २१ व ग्रामीण मार्ग ११ पाण्याखाली गेले आहेत. आपत्तीचा सामना करण्यासाठी एन.डी. आर.एफ. पथक (३० जवान) ५ जूनपासून व एक सैन्य दल पथक (१०७ जवान) २६ जुलैपासून जिल्ह्यात तैनात आहे. त्यांच्या वतीने ठिकठिकाणी रंगीत तालीम घेण्यात आली आहे.

जिल्ह्यात शनिवारी सकाळी आठ वाजता संपलेल्या २४ तासांत सरासरी ६.३ मिमी पावसाची नोंद झाली असून, शिराळा तालुक्यात सर्वाधिक २३.७ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

# राज्यात २५१५ गावांतील विकासकामे थांबणार?

## पश्चिम घाट मसुदा अधिसूचनेतील नोंदींमुळे प्रकल्पांवर परिणाम



मुंबई : केंद्र सरकारने पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील म्हणून जाहीर केलेल्या क्षेत्रात राज्यातील २५१५ गावांचा समावेश आहे. यासंबंधी नव्याने जारी अधिसूचनेवर अंमलबजावणी झाल्यास विशेषत: रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर आणि पुणे या जिल्ह्यांतील अनेक प्रस्तावित प्रकल्प, उद्योगांवर प्रभाव पडण्याची शक्यता आहे.

केरळमधील वायनाड जिल्ह्यात नुकतेच अतिपावसामुळे झालेल्या भूस्खलनामुळे दोनशेहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून, कित्येक जण बेपत्ता आहेत. या घटनेनंतर पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असा पश्चिम घाट आणि या क्षेत्रातील विकासकामांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला. यासंदर्भात ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांनी २०११मध्ये केंद्र सरकारला सादर केलेल्या अहवालाकडेही लक्ष वेधले जात आहे.

पश्चिम घाटाला पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील घोषित करण्यासाठीचा पाचवा मसुदा केंद्राने नुकताच जाहीर केला आहे. त्यानुसार राज्यातील १७ हजार ३४० चौ. किमी क्षेत्र संवेदनशील म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित आहे. यापूर्वी २०२२ साली जाहीर केलेल्या मसुद्यानुसार राज्यातील २१३३ गावांचा समावेश संवेदनशील क्षेत्रात करण्याचे प्रस्तावित होते. त्यातील ३८८ गावे वगळण्याची मागणी करण्यात येत होती. राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनातही हा विषय गाजला होता. विकास प्रकल्प, औद्योगिक प्रकल्प, खाणी प्रस्तावित असलेली गावे वगळण्याबाबत केंद्राकडे प्रस्ताव पाठवण्यात येईल, असे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जाहीर केले होते. गेल्या वर्षी जानेवारीत साधारण ५८२ गावे वगळण्याची विनंती केंद्राकडे करण्यात आली होती. मात्र, आता नव्याने जाहीर झालेल्या या मसुद्यात गावे वगळण्याऐवजी राज्यातील संवेदनशील म्हणून घोषित गावांची संख्या वाढल्याचे दिसते आहे.

कोल्हापूर, सातारा, पुणे, रायगड या भागांत अनेक विकास प्रकल्प प्रस्तावित आहेत. पुणे शहराच्या लगत वाढ होणारी मुळशी, मावळ, आंबेगाव या भागांतील अनेक गावे संवेदनशील क्षेत्र म्हणून प्रस्तावित आहेत. रत्नागिरीतील परशुराम-पेढे, राजापूर, खेड, लांजा येथील अनेक गावे, सिंधुदुर्गातील देवगड, कणकवली, सावंतवाडी, कुडाळ, वैभववाडी येथील गावेही संवेदनशील घोषित होणार आहेत. नुकताच राज्याने सातारा येथील विकास कामांचा आढावा जाहीर केला. मात्र, महाबळेश्वर, वाई, सातारा, पाटण येथील अनेक गावांचा केंद्राने जाहीर केलेल्या आराखड्यात समावेश आहे. यापूर्वी कोल्हापूर येथील अनेक गावे वगळण्याची मागणी प्राधान्याने होत होती. कोल्हापूरमधील पन्हाळा, गगनबावडा, भूदरगड, चंदगड, आजरा, राधानगरी येथील गावांचा मसुद्यात समावेश आहे. तर रायगडमधील रोहा, महाड, माणगाव, कर्जत, खालापूर, सुधागड येथील गावे समाविष्ट आहेत. मुंबई महानगर प्रदेशात आलेल्या पालघर येथेही अनेक विकास प्रकल्प प्रस्तावित आहेत. तेथील जव्हार, मोखाडा, वाडा येथील गावांचा मसुद्यात समावेश असल्याचे दिसते आहे.

कोणत्या जिल्ह्यात किती गावे?

नगर (४८), धुळे (७), कोल्हापूर (२१२), नंदुरबार (२), नाशिक (२०२), पालघर (१२६), पुणे (४१५), रायगड (४३७), रत्नागिरी (३११), सांगली (१३), सातारा (३३६), सिंधुदुर्ग (१९८), ठाणे (२०८).

# खडकवासला धरणातील विसर्ग दिवसा वाढवून पाणीसाठा ६५ टक्क्यांवर आणावा : पालकमंत्री अजित पवार



**पुणे :** मागील काही दिवसांपासून पुणे शहर आणि जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरू आहे. पुणे शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणात देखील पावसाने जोरदार हजेरी लावली असून सद्यस्थितीला खडकवासला धरण साखळी क्षेत्र ९२.५८ टक्के भरले आहे. तर २६.९९ टीएमसी इतका पाणीसाठा जमा झाला आहे. धरण क्षेत्रात जोरदार पाऊस होत आहे. त्या पार्श्वभूमीवर खडकवासला धरणामधून ३५ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग नदी पात्रात सोडण्यात आला आहे. यामुळे सिंहगड रोड परिसरातील नदी काठच्या भागातील सोसायटीमधील पाणी जाण्याच्या घटना घडल्या आहे.

त्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पुणे, पिंपरी चिंचवड शहरातील पूरपरिस्थितीचा आढावा दूरध्वनीद्वारे घेतला.खडकवासला धरणातील विसर्ग दिवसा वाढवून पाणीसाठा ६५ टक्क्यांवर आणावा, जेणेकरून रात्रीच्यावेळी पाऊस झाल्यास नदीपात्रात अधिक विसर्ग करावा लागणार नाही. महापालिकेने ध्वनिक्षेपक आणि समाज माध्यमाद्वारे नागरिकांना खबरदारी घेण्याच्या सूचना द्याव्यात, त्यांना वेळोवेळी पुरपरिस्थितीची माहिती द्यावी, अशा सूचना त्यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांनी एकता नगर परिसराला भेट दिली. तेथील मदत आणि बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असून त्याचा आढावाही अधिकाऱ्यांनी घेतला. अधिकाऱ्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. दरम्यान भारतीय लष्कराची एक तुकडी मदतकार्यासाठी दाखल झाली आहे. या तुकडीत १०५ जवान आहेत आणि आवश्यकता असल्यास आणखी एक तुकडी राखीव म्हणून तयार ठेवण्यात आली आहे.

# उजनी धरणावर साकारणार पूल, बोट दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर मंजुरी



**सोलापूर :** उजनीतील जीवघेण्या जलवाहतुकीपासून कायमची मुक्तता होण्याच्या दृष्टीने कुगाव (ता. करमाळा) ते शिरसोडी (ता. इंदापूर) या अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर उड्डाणपुलाची उभारणी होणार आहे. त्यासाठी शासनाने यापूर्वी ३९५ कोटी ९७ लाख ३२ हजार रुपये खर्चास प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर आता पुलाच्या कामाची २८४ कोटी ५३ लाख रुपये किमतीची निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. नुकतीच २१ मे रोजी कुगाव येथून शिरसोडीकडे जाणारी प्रवासी बोट उलटून त्यात सहा जणांनी जीव गमावला होता.

सोलापूर, पुणे आणि अहमदनगर जिल्ह्याने वेढलेल्या उजनी जलाशयात जलवाहतूक हेच दळणवळणाचे प्रमुख साधन असून, भूमार्गाने प्रवास केल्यास १०० ते १२५ किलोमीटर अंतर दूर नाहक वळसा घालावा लागतो. उजनी जलाशयातील प्रवास केवळ पाच किलोमीटर अंतराचा आहे. या भागात तिन्ही बाजूंनी जलाशयाने वेढलेले असून, त्यात कुगाव व शिरसोडीसह वाशिंबे, कळाशी, सोगाव, गंगावळण, कलठण, चिखलठाण, गोयेगाव, आगोती, पडथाळ, ढोकरी, शहा, केत्तूर, चाआडगावा आदी १४ गावे एकमेकांशी जोडली आहेत. परंतु या जलाशयात बोट प्रवासी वाहतूक तेवढीच जीवघेणी समजली जाते. अधूनमधून घडणाऱ्या दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर एकमेकांना जोडल्या गावांच्या दरम्यान, उजनी जलाशयावर कुगाव ते शिरसोडीसह गोयेगाव (ता. करमाळा) ते आगोती (ता. इंदापूर) आदी जलमार्गावर पुलाची उभारणी करण्याची मागणी सातत्याने होते.

दरम्यान, कुगाव ते शिरसोडी या पाच किलोमीटर अंतराच्या जलमार्गावर नवीन पूल बांधण्यासाठी शासनाने ३९७ कोटी ९७ लाख ३२ हजार रुपये खर्चास प्रशासकीय मान्यता यापूर्वीच दिली आहे. तर अलीकडे पुलाच्या कामासाठी २८४ कोटी ५३ लाख रुपये किमतीची निविदा प्रसिद्ध झाली आहे. दुसरीकडे गोयेगाव ते आगोती दरम्यानच्या जलमार्गावर पूल बांधण्यासाठी सर्वेक्षण करण्याचा आदेश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता. त्यावर कार्यवाही प्रलंबित आहे.

उजनी जलाशयावर कुगाव-शिरसोडी व अन्य गावांसाठी चार जलमार्ग आणि एकच भूमार्ग उपलब्ध आहे. जलमार्ग नजीकच्या अंतरावर असले, तरी ते तेवढेच जोखमीचे आणि जीवघेणे समजले जातात. दुसरीकडे भूमार्गाने जायचे तर सुमारे १२५ किलोमीटर अंतर नाहक वळसा घालावा लागतो. जलवाहतुकीने जवळच्या गावाला जायचे तर अवघी १५ ते २० मिनिटे लागतात. भूमार्गाने तीन तास लागतात. शिवाय जलवाहतुकीच्या तुलनेत जादा पैसे आणि वेळ खर्च करावा लागतो. मात्र कुगाव ते शिरसोडी दरम्यान जलाशयावर पुलाची उभारणी होणार असल्यामुळे करमाळा व इंदापूर भागातील गावांच्या विकासाला चालना मिळणार आहे. विशेषत: उजनी जलाशय परिसरात विशेषत: वाशिंबे व अन्य भागात निर्यातक्षम केळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होते. येथील केळी प्रामुख्याने आखाती देशांमध्ये निर्यात होतात. त्या दृष्टीने मुंबईच्या बंदरापर्यंत ही केळी पाठविण्याचा मार्ग उपलब्ध होणार आहे.

# रायगड जिल्ह्यातील वर्षा पर्यटन स्थळांवर बंदी का घातली गेली?


**अन्वी कामदार या इन्टाग्राम इन्फ्लुएन्सरचा कुंभे येथील धबधब्या जवळ रिल करत असताना, तीनशे फूट दरीत पडून मृत्यू झाला. या घटनेनंतर कुंभे परिसरातील वर्षा सहलींवर बंदी घालण्यात आली. त्याचबरोबर पोलादपूर, खालापूर आणि कर्जत मधील पर्यटनस्थळे बंद झाली. ती का, या विषयाचा आढावा**

**रायगड जिल्ह्यातील वर्षा पर्यटन स्थळे**

वर्षा पर्यटनासाठी रायगड जिल्हा हा पर्यटकांच्या विशेष पसंतीचा समजला जातो. कर्जत, माणगाव, महाड, पोलादपूर, रोहा तालुके वर्षा सहलींसाठी प्रसिद्ध आहेत. त्यामुळे पावसाळ्यात दर शनिवार-रविवारी धबधबे आणि धरणामधील पाण्यात मनसोक्त भिजण्यासाठी हजारो पर्यटक दाखल होत असतात. कर्जतमधील पेब किल्ला, इरशाळगड, माणिक गड, कोथळी गड, सोलनपाडा धरण, सागरगड, ताम्हाणी घाट, देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट, कुंभे धबधबा आणि परिसर, कोथेरी धबधबा, रायगड किल्ला, मोरझात धबधबा आणि कुडपण ही प्रमुख वर्षा पर्यटनस्थळे आहेत. पण गेल्या काही वर्षात येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या अनियंत्रित पद्धतीने वाढत चालली आहे. त्यामुळे निर्माण होणारे प्रश्न आणि दुर्घटना यामुळे पर्यटकांच्या सुरक्षेचा मुद्दा प्रकर्षाने समोर आला आहे.

**अन्वी कामदारचा मृत्यू कसा झाला?**

प्रसिद्ध इन्स्टाग्राम इन्फ्लुएन्सर अन्वी कामदार ही तिच्या सहा सहकाऱ्यांसमवेत माणगाव तालुक्यातील कुंभे येथे वर्षा सहलीसाठी आली होती. कुभे धबधब्याच्या शेजारी असलेल्या कड्यावर रिल करत असतांना तिचा तोल गेला आणि ती ३०० फूट दरीत कोसळली. बचाव पथकाने जखमी झालेल्या अन्वीला खोल दरीतून दोरीला स्ट्रेचर बांधून बाहेर काढले. तिला रुग्णालयात दाखल केले. मात्र तिचा मृत्यू झाला होता.



स्थानिक परिस्थितीकडे दुर्लक्ष करत कड्यावर धोकादायक ठिकाणी जाणे अन्वीसाठी जीवघेणे ठरले.

**या घटनेचा परिणाम काय झाला?**

अन्वी कामदारच्या दुर्घटनेनंतर माणगावच्या प्रांताधिकाऱ्यांनी कुंभे परिसरातील वर्षा पर्यटन स्थळांवर बंदी आदेश लागू केले. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये बंदी घालण्यात आली. पर्यटकांच्या आणि स्थानिकांच्या जिवाला धोका होऊ नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे माणगाव तालुक्यातील कुंभे, देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट ही स्थळे पर्यटकांसाठी बंद करण्यात आली. या ठिकाणी पर्यटन पूरक व्यवसाय करणाऱ्यांचे रोजगार अडचणीत आले.

**जिल्हा प्रशासनाची प्रतिबंधात्मक पावले**

पावसाळ्याच्या सुरवातीला जिल्हा प्रशासनाने वर्षा पर्यटन केंद्रे खुली ठेवण्याचे धोरण स्वीकारले होते. स्थानिकांचे रोजगार अडचणीत येऊ नये हा त्यामागचा उद्देश होता. मात्र अलिबाग, खालापूर, माणगाव, रोहा तालुक्यातील वर्षासहलीसाठी आलेल्या काही पर्यटकांचे मृत्यू झाले. यानंतर प्रशासनाने प्रतिबंधात्मक पावले उचलण्यास सुरुवात केली. कर्जत, खालापूर, माणगाव, रोहा आणि पोलादपूर तालुक्यात प्रशासनाने पर्यटकांवर बंदी घालण्याचे आदेश काढले.

**बंदी घालण्यामागची कारणे कोणती?**

पर्यटकांना स्थानिक भौगोलिक परिस्थितीची माहिती नसते. पाण्याच्या प्रवाहांचा अंदाज नसतो. स्थानिकांनी केलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष केले जाते. अचानक पाऊस वाढला तर धबधब्यांतील पाण्याचा प्रवाह वाढतो आणि खाली असलेले पर्यटक वाहून जाण्याचा धोका असतो याची जाणीव पर्यटकांना नसते. वर्षा सहलीसाठी येणारे पर्यटक मद्यप्राशन करून धबधब्याखाली जातात. मद्यप्राशन करून वाहने चालवतात. सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन केले जाते. महिलांशी असभ्य वर्तन केले जाते. धोकादायक ठिकाणी चढण्याचा प्रयत्न केला जातो. तर धोकादायक ठिकाणी जाऊन फोटो सेशन केले जाते. पाण्याच्या खोलीचा बरेचदा पर्यटकांना अंदाज नसतो.

**यावर्षीचे आकडे काय सांगतात?**

या वर्षी मे महिन्यान खालापूर तालुक्यातील जांभिवली गावात दोन चिमुकल्यांचा नदीपात्रात बुडून मृत्यू झाला. जुन महिन्याच्या सुरवातीला उरण तालक्यातील पिरकोन येथे दोन जणांचा बुडून मृत्यू झाला. त्यानंतर आळंदी येथील एक पर्यटक अलिबाग येथे बुडाला २१ जुनला रिझवी महाविद्यालयातील ४ पर्यटक खालापूर येथील धरणात बुडाले. २२ जुनला महाड येथे दोघांचा बुडून मृत्यू झाला. २३ जूनला अलिबाग मुनवली येथे दोन मुले दगावली. जुलै महिन्यात रायगड परिसरात धबधब्याखाली भिजण्यासाठी गेलेला तरुण प्रवाहात वाहून गेला. कुंभे येथे अन्वी कामदार ही तरुणी दरीत पडून मृत्युमुखी पडली. याशिवाय माथेरान येथे पेब किल्लूयावर ट्रेकींगसाठी आलेली एक तरुणी दरीत पडून गंभीर जखमी झाली. तीन महिन्यात १५ जणांचा मृत्यू झाला आहे.



# भारताने ब्रिटनला पेनल्टी शूटआऊटमध्ये धूळ चारत रचला इतिहास, उपांत्य फेरीत मारली धडक

**पॅरीस :** भारतीय हॉकी संघाने पेनल्टी शूटआऊटमध्ये ब्रिटनचा पराभव करून इतिहास रचला आणि सलग दुसऱ्यांदा ऑलिम्पिकची उपांत्य फेरी गाठली. चार क्वार्टर संपल्यानंतर दोन्ही संघांचा स्कोअर १-१ असा बोरबरीत होता. ज्यामुळे निर्धारित वेळेपर्यंत दोन्ही संघांनी आघाडी घेण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना यश आले नाही. यानंतर पेनल्टी शूटआऊटचा अवलंब करण्यात आला. ज्यामध्ये भारताने ब्रिटनचा ४-२ असा पराभव केला.

या सामन्यात भारत १० खेळाडूंसह खेळत होता कारण अमित रोहिदासला दुसऱ्या क्वार्टरमध्ये रेड कार्ड मिळाल्यामुळे तो संपूर्ण सामन्यातून बाहेर पडला होता. मात्र, भारतीय संघाने हार न मानता अखेरपर्यंत ब्रिटनला कडवी झुंज दिली. अशा प्रकारे भारतीय संघाने पदकाच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले आहे. भारत उपांत्य फेरीत विजय मिळवण्यात यशस्वी ठरला, तर किमान रौप्यपदक निश्चित होईल. भारताचा उपांत्य फेरीचा सामना मंगळवार, ६ ऑगस्ट रोजी होणार आहे.

भारत आणि ब्रिटन यांच्यातील उपांत्यपूर्व सामन्याच्या तिसऱ्या फेरीपर्यंत १-१ अशी बरोबरी होती. दोन्ही संघांनी प्रतिआक्रमण केले, मात्र त्यांना गोल करता आला नाही. तत्पूर्वी, हाफ टाईमपर्यंत दोन्ही संघांचा स्कोअर १-१ असा बरोबरीत होता. दुसऱ्या क्वार्टरमध्ये भारताच्या अमित रोहिदासला रेड कार्ड मिळाल्यामुळे त्याला मैदान सोडावे लागले. याचा अर्थ भारतीय संघ आता उर्वरित सामने १० खेळाडूंसह खेळावे लागले. मात्र, हरमनप्रीत सिंगने केलेल्या शानदार गोलच्या जोरावर भारताने ती मागे टाकली आणि आघाडी घेतली, मात्र ली मॉर्टनने लवकरच ब्रिटनसाठी बरोबरी साधणारा गोल केला.

**रोहिदासला मिळाले रेड कार्ड –** ब्रिटनसाठी ली मॉर्टनने काउंटर टॅकवर गोल केला, तर हरमनप्रीत सिंगने पेनल्टी कॉर्नरवर गोल करत २२ व्या मिनिटाला भारतीय संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. पॅरिस ऑलिम्पिकमधील हरमनप्रीतचा हा सातवा गोल होता. मॅच रेफ्रींनी रोहिदासला ब्रिटिश खेळाडूच्या डोक्यात जाणीवपूर्वक हॉकी स्टिकने मारल्याबद्दल दोषी ठरवले आणि त्याला रेड कार्ड देऊन बाहेर पाठवले. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये खेळाडूला रेड कार्ड देण्याची ही पहिलीच वेळ आहे.

**भारतीय हॉकी संघाने १० खेळाडूंसह खेळत मारली बाजी –** पहिल्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघांना पेनल्टी कॉर्नर मिळाले, मात्र त्यांचे गोलमध्ये रूपांतर कोणीही करू शकले नाही. यादरम्यान भारताचा गोलरक्षक पीआर श्रीजेशने दमदार कामगिरी करत ब्रिटनचे प्रत्येक आक्रमण रोखण्यात यश मिळवले. भारताने सलग तीन पेनल्टी कॉर्नर जिंकले, पण त्यांचे गोलमध्ये रूपांतर करू शकले नाही. भारताने ग्रुप स्टेजमध्ये चमकदार कामगिरी केली होती आणि आता संघाला बाद फेरीतही ही गती कायम राखावी लागणार आहे. भारतीय संघ हा सामना जिंकण्यात यशस्वी ठरल्यास पदकाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकेल.





# अमित रोहिदासला रेड कार्ड देत अचानक मैदानाबाहेर का काढल

पॅरिस : भारतीय हॉकी संघाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. पदकाच्या दिशेने मोठे पाऊल टाकले. पण यावेळी भारतीय संघाला १० खेळाडूंनिशी खेळावे लागले. कारण भारताचा हॉकीपटू अमित रोहिदासला रेड कार्ड दाखवण्यात आले आणि त्यामुळे त्याला मैदानाबाहेर करण्यात आले. पण अमितला यावेळी रेड कार्ड का दाखवलं, त्याची काय चूक होती. हॉकीचे नियम कायम सांगतात, ही सर्व माहिति आता समोर आली आहे.

ही गोष्ट घडली ती दुसऱ्या सत्रात. दुसऱ्या सत्रातील १२ वे मिनिट सुरु होते. त्यावेळी चेंडू होता तो अमितकडे. अमित हा चेंडू घेऊन आक्रमण करत होता. त्यावेळी अमितला घेण्यासाठी दोन ग्रेट ब्रिटनचे खेळाडू पुढे सरसावले होते. या दोन्ही खेळाडूंनी अमितला दोन्ही बाजूंनी घेरले होते. पण तरीही अमित या दोघांना शिताफिने दूर सारण्याचा प्रयत्न करत होता, यावेळी खेळ चांगलाच वेगात सुरु होता. अमित चेंडू घेऊन वेगाने पुढे जात होता आणि त्याला रोखण्याचा प्रयत्न हे दोघे खेळाडू करत होते. त्यावेळी चेंडू पुढे ढकलत असताना अमितच्या हाता-तली हॉकी स्टीक ही थोडी उंच झाली आणि ती मागे असलेल्या ग्रेट ब्रिटनच्या खेळाडूला लागली. त्यामुळे तो तिथेच मैदानात पडला.

हॉकीचा नियम यावेळी सांगतो तरी काय, जाणून घ्या....

जेव्हा खेळ सरु असतो तेव्हा खेळाडूंनी आपली हॉकी स्टीक ही जमिनीलगत ठेवायची असते. जर चेंडू हवेतून आला तर त्याला रोखण्यासाठी फक्त हॉकी स्टीक वर घेतली जाऊ शकते. हॉकी स्टीक वर घेत असताना कोणत्याही खेळाडूला धोका पोहोचणार नाही, याची काळजी प्रथम घ्यायची असते. दुसऱ्या खेळाडूच्या डोक्यापर्यंत हॉकी स्टीक पोहोचता कामा नये.


अमितची हॉकी स्टीक ही प्रतिपस्पर्धी खेळाडूच्या डोक्याला लागली. त्यामुळे नियमानुसार ही चूक आहे. त्यामुळे भारताला रेड कार्ड दिले, याला चिटींग म्हणता येणार नाही. त्यामुळे जे पंचांनी केलं ते योग्यचं होतं, असं समोर दिसत आहे.

बीडचा अविनाश साबळे पॅरिस ऑलिम्पिकचं मैदान मारण्यासाठी सज्ज

अमित रोहिदासला रेड कार्ड दिल्यामुळे भारताला १० खेळाडूंनिशी खेळावे लागले आणि त्याला मैदाना बाहेर जावे लागले. पण भारतीय संघाने हार मानली नाही. त्यांनी दमदार खेळ केला. सामना बरोबरीत सुटला आणि त्यानंतर झालेल्या शूट आऊटमध्ये त्यांनी बाजी मारली.

## फिल्मी दूनिया

# किशोर कुमार नावाच्या मनमनांत वाहणाऱ्या आनंदमयी झऱ्याची गोष्ट!



## हरहुन्नरी कलावंत किशोर कुमार यांचा आज वाढदिवस

किशोर कुमार, हे नाव घेतलं तरीही डोळ्यांसमोर त्यांचा खेळकर चेहरा लगेच येतो. त्यापाठोपाठ आठवतो तो त्यांचा सुमधुर आवाज. आज याच आपल्या लाडक्या किशोर कुमार यांची जयंती. किशोर कुमार यांनी गायलेली गाणी आजही प्रचंड लोकप्रिय आहेत. शास्त्रीय संगीत न शिकलेला हा हरहुन्नरी गायक त्याच्या गोड आवाजाने आजही आपल्या मनावर राज्य करतो आहे.

बहुढंगी आणि हरहुन्नरी हेच विशेषण किशोर कुमार यांच्यासाठी योग्य

किशोर कुमार यांचं वर्णन जर एका शब्दात करायचं झालं तर बहुढंगी असंच करता येईल. अभिनय, गाणं, नाच, तोंडाने विशिष्ट आवाज काढण्याची ढब, पडद्यावर प्रचंड मस्ती करणारा नायक हा त्यांनी लीलया रंगवला. त्यांच्या अभिनयाचं उत्तम उदाहरण म्हणजे हाफ तिकिट नावाचा सिनेमा ले गई मेरा दिल तेरी तिरछी नजरिया हे गाणं पाहिलं की किशोर कुमार पडद्यावर कशी धमाल करत होते त्याची साक्ष पटते. चलती का नाम गाडीमधलं पाच रुपया बारा आना, इक लडकी भिगी भागी भागीसी ही गाणीही तशीच. किंवा मधुबालाचं हाल कैसा है जनाब काफहे गाणं असेल. कितीतरी गाणी सांगता येतील. जी आपण गुणगुणलो तरीही किशोर कुमार लगेच मनात येतो. अवघ्या ५८ वर्षांच्या आयुष्यात हा माणूस आपल्याला किती मोठी देणगी देऊन गेला हे जाणवतं.

किशोर कुमार आणि सैगल यांची भेट आणि..

किशोर कुमार ( घळीहेंीश घींीरी ) हे शास्त्रीय संगीत शिकले नव्हते. त्यांचे गुरु होते कुंदनलाल सैगल. लहान असताना ते सैगल यांची गाणी गायचे. पण सैगल जसं गायचे किशोर कुमार गायचे. त्यांना मिळालेला आवाज देवाची देणगी होता. सैगल आणि किशोर कुमार यांची भेट झाली नाही असं अनेकांना वाटतं पण ती झाली होती. अशोक कुमार म्हणजेच किशोर यांचे मोठे बंधू आणि सगळ्यांचे लाडके दादामुनी किशोर कुमार यांना सैगल यांच्या घरी घेऊन गेले होते. त्यावेळी किशोरदा नऊ वर्षांचे होते. तिथे त्यांनी गाणंही म्हटलं. ज्यानंतर सैगल अशोक कुमार यांना म्हणाले, अशोक तुझा भाऊ खूप छान गातो, पण त्यांच्यात एक अंगदोष आहे. त्यावर सैगल यांना अशोक कुमार यांनी विचारलं काय दोष आहे तो? सैगल चटकन म्हणाले, अरे किशोर गाणं म्हणताना स्थिर राहात नाही सारखा हलत असतो. अमित कुमार यांनी एका मुलाखतीत ही आठवण सांगितली होती.

किशोर कुमार लतादीदींपेक्षा जास्त मानधन घ्यायचे

अमित कुमार यांनी याच मुलाख-तीत ही आठवणही सांगितली होती की किशोर कुमार गाण्यांसाठी लता मंगेशकरांपेक्षा जास्त मानधन घ्यायचे. सिनेमासाठी लता मंगेशकर जर ८० हजार घेणार असतील तर बाबा (किशोर कुमार) सांगायचे मी ९० हजार घेणार. यातली महत्त्वाची बाब ही होती की निर्माते पैसे मंजूर करायचे. घरी येऊन त्यांना पैसे द्यायचे कारण त्यांना वाटायचं की किशोर कुमार यांनी आपल्या चित्रपटात गाणं म्हणावं.

रुप तेरा मस्तानाफ गाण्याची आठवण

किशोर कुमार आणि अमित कुमार एका गाण्याच्या रेकॉर्डिंगसाठी एस.डी. बर्मन यांच्या घरी गेले होते. त्यावेळी शक्ती सामंता, आर.डी. बर्मन आणि राजेश खन्ना हे तिघंही तिथे होते. किशोर कुमार यांना लक्षात की सचिनदा (ए.स.डी बर्मन) यांनी घरी बोलवलं पण आधी आलेले तिघं शांत बसलेत, काहीतरी गडबड आहे. एस.डी. बर्मन म्हणाले, मी भाटियाली पद्धतीने एक गाणं केलं आहे. तू ते गाणं तसंच म्हणायचं आहे. त्यावेळी शक्ती सामंता आले किशोर कुमार यांना म्हणाले की, किशोर, सचिनदांनी गाणं केलंय पण मला ते आवडलेलं नाही. काही मजा येत नाहीये. मला हे भाटियाली वगैरे नको आहे. एस.डी. बर्मन यांना लक्षात आलं त्यावेळी त्यांनी पुन्हा किशोर कुमार यांना बजावलं की मी म्हणतोय तसंच गायचं. आता हा प्रश्न कसा सोडवायचा? याचा विचार करतानाच किशोर कुमार यांना सचिनदांचं एक गाणं ज्याचे फक्त डमी शब्द लिहिले होते ते आठवलं. त्यांनी सचिनदांना सांगितलं माझं ऐका एक गाणं तुम्ही केलं होतं आठवतंय का? ते म्हणाले नाही मग किशोर कुमार यांनी डमी शब्दांची ती चाल त्यांना ऐकवली सचिनदा खुश झाले आणि रुप तेरा मस्ताना, प्यार मेरा दिवानाफ हे आराधना सिनेमातलं गाणं जन्माला आलं.

किशोर कुमार महाविद्यालयीन आयुष्यापासूनच खोडकर

किशोर कुमार यांचा जन्म मध्य प्रदेशातल्या खंडवामध्ये झाला होता. त्यांचे वडील प्रतिष्ठीत वकील होते. अशोक कुमार आणि अनुप कुमार हे किशोरदांचे भाऊ. किशोर कुमार यांचं शिक्षण खंडवामध्ये पूर्ण झालं. त्यानंतर ते इंदूरला आले तिथे त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण घेतलं. कॉलेज मधल्या बेंचवर उभं राहून गाणं म्हण, नकला करुन दाखव, शिक्षकांचा आ-वाज काढ या सगळ्या गोष्टी किशोर कुमार यांनी त्या काळात केल्या होत्या. त्यांचं खरं नाव आभास कुमार गांगुली होतं. मात्र सिनेमा जगतात आल्यानंतर त्यांनी ते बदलून किशोर कुमार असं ठेवलं.

शिकारी या सिनेमातून त्यांनी अभिनय कारकीर्द सुरु केली

१९४६ मध्ये आलेल्या शिकारीफ या सिनेमातून किशोर कुमार यांनी त्यांच्या अभिनयाची सुरुवात केली. तर १९४८ मध्ये त्यांनी पहिल्यांदा पार्श्वगायन केलं. त्यांनी जिद्दी सिनेमात देवानंद यांच्यासाठी गाणं म्हटलं. किशोर कुमार यांनी त्यानंतर मागे वळून पाहिलंच नाही. देवानंद, अमिताभ बच्चन, राजेश खन्ना अशा अनेक स्टार्ससाठी गाणी म्हटली. राजेश खन्ना यांना त्यांचा आवाज खूप जास्त मॅच व्हायचा. तसंच राजेश खन्ना हे असे हावभावही करायचे की आपल्याला वाटायचं तेच गात आहेत.

किशोर कुमार नावाचा आनंदाचा झरा

आनंदी गाणी असोत, उडत्या चालीची असोत किंवा अगदी दर्दभरे गीत किशोर कुमार यांचा गाणी म्हणण्याचा आवाका खूप मोठा होता. त्यांनी पडोसन या सिनेमात गायलेली गाणीही एकाहून एक हिट आहेत. तसंच राजेश खन्ना यांच्या आराधना, मेहबुबा, हाथी मेरे साथी, कटी पतंगफ, दागफ, आप की कसमम, अजनबी अशा कितीतरी चित्रपटांसाठी किशोर कुमार हे राजेश खन्ना यांचा आवाज झाले. आजही त्यांच्या गाण्यांचं गारुड कायम आहे. त्यांची गाणी ही आजही ऐकावीशी वाटतात, ऐकली जातात. किशोर कुमार प्रेक्षकांचं पिढ्या अन् पिढ्या प्रेम लाभलेला एकमेव कलाकार आहे. त्याच्या आवाजाची जादू ही आजही आकर्षित करते, एक खास आठवण मनात जागवते यात शंका नाही. किशोर कुमार हे आनंदाचा स्वच्छंदी झरा होते. त्यांनी तो आनंद त्यांच्या गाण्यांतून सगळ्या जगाला वाटला आहे. त्यामुळे निर्मळ आणि मधुर आवाजाचा झरा आज मनामनांतून अवितरपणे वाहतो आहे.